दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -३४९ | शुक्रवार,दि.२२ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-349 | Friday, Dt.22 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# बीड जिल्हा परिषदेच्या त्या ४ सहाय्यक प्रशासन अधिकाऱ्याच्या नियमबाह्य बदल्या रद्द - विभागीय आयुक्त

## बदली अपात्र सहायक प्रशासन अधिकारी सुनील नवले, जयलाल राजपूत,अनंत खेडकर व शिवाजी आदमुलवाड यांच्या नियमबाह्य बदल्या रद्द

बीड प्रतिनिधी

बदलीचे अधिकार नसतांना विभागीय आयुक्त यांची मान्यता न घेता बीड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुनील नवले, जयलाल राजपूत,अनंत खेडकर व शिवाजी आदमुलवाड या चार सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या केलेल्या बदल्या रद्द करण्यात याव्यात आणि दोषी विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई पंधरा दिवसात करण्यात यावी, असे आदेश विभागीय आयुक्त यांनी दिले आहेत. या आदेशाने जिल्हा परिषद प्रशासनामध्ये खळबळ उडाली आहे.

या संदर्भात दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या आदेशात विभागीय आयुक्त यांनी म्हटले आहे की, बीड जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०२४ मध्ये जिल्हा परिषदेत बदली अपात्र चार सहायक प्रशासन अधिकारी सुनील नवले, जयलाल राजपूत,अनंत खेडकर व शिवाजी आदमुलवाड यांच्या नियमबाह्य बदल्या केल्या. यामधील सुनील नवले शिक्षण विभागात दिड वर्षापूर्वी रुजू झाले असले तरी ते बदलीस अपात्र होते. जयपाल राजपूत हे तीन वर्षांपूर्वी रुजू झाले होते. शिवाजी आदमुलवाड, पंचायत समिती, वडवणी येथे एका वर्षापूर्वीच रुजू झाले असून ते बदलीस अपात्र होते. शासन नियमानुसार विभाग, टेबल बदलीसाठी पाच वर्ष सेवेचा कार्यकाळ पूर्ण करावा लागतो. सर्वसाधारण बदल्यासाठी पाच वर्ष सेवा ज्येष्ठता ग्राह्य धरण्यात येते. प्रशासकीय बदलीसाठी १० वर्ष सेवा आवश्यक आहे. विनंती बदलीसाठी तीन वर्षे सेवा व्यतिरिक्त बदल्यांसाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक आहे. तसेच न्यायालयाच्या आदेशाने बदली करता येईल यापैकी काहीही नसताना सन २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकांच्या आचार संहितेच्या कारणाने शासनाने दि.३१ मे पर्यंत बदल्याचे आदेश दिले नव्हते. दि. ३१ मे नंतरच्या अपवादात्मक




### सदर बदली प्रक्रियेमध्ये अनियमितता करण्यास जे अधिकारी व कर्मचारी दोषी त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही होणार ?

बदल्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना असतांना नियमबाह्य आर्थिक लाभ घेवून मर्जीतील बदल्या करण्यात आल्या होत्या.

वडवणी पंचायत समितीचे सहाय्यक प्रशासन अधिकारी शिवाजी आदमुडवाड बदलीस पात्र नव्हते. प

तथापि गिरीष बिजलवाड, यांना जि.प. सेवेतून निलंबीत करण्यात आल्यानंतर शिक्षण विभाग (प्रा) कार्यालयातील कामाचा व्याप लक्षात घेता त्यांचे जागेवर शिवाजी आदमुलवाड, सहायक प्रशासन अधिकारी यांना पुर्णवेळ अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. गिरीष बिजलवाड, यांचा निलंबन कालावधी ३ महिन्यापेक्षा जास्त झालेला असल्याने त्यांना जिल्हा परिषद सेवेत पुनःस्थापित करण्यात आले. मात्र जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर रिक्त पद नसल्यामुळे त्यांना पदस्थापना देण्याकरिता सहायक प्रशासन अधिकारी संवर्ग एकूण १९

(उर्वरीत पान २ वर)

## सुनील काकडे याचे एमबीबीएस मेडिकल नेट परीक्षेत यश



बदनापूर ।प्रतिनिधी

बदनापूर तालुक्यातील वरुडी गावातील सुनील काकडे या तरुणाने आपली जिद्द व कष्ट यांच्या जोरावर मेडिकल नेट परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे देशभरातून घेण्यात आलेल्या या कठीण परीक्षेत सुनीलने ८१४वा क्रमांक मिळवून गावाचे नाव उज्वल केले आहे.

सुनीलच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण पसरले असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्यासाठी सुनीलने केलेला संघर्ष व त्यामागील परिश्रम खरच प्रेरणादायी असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले सुनीलला पुढील वाटचालीसाठी सरपंच राधाकिसन शिंदे ,पुरुषोत्तम जोशी ,विष्णू शिंदे, राजेंद्र शिंदे, अमित

(उर्वरीत पान २ वर)

## सावंत सरकारमध्ये नवे चेहरे, राज्यपालांच्या हस्ते दिगंबर कामत आणि रमेश तवडकर शपथबद्ध



पणजी ।प्रतिनिधी

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मंत्रिमंडळामध्ये फेरबदल करण्याच्या चर्चा सुरू होत्या. अखेर आज गुरुवारी गोव्याचे राज्यपाल श्री पशूपती अशोक गजपती राजू यांनी राजभवनात झालेल्या छोटेखानी सभारंभात मडगावचे आमदार दिगंबर कामत आणि विद्यमान सभापती रमेश तवडकर यांना

(उर्वरीत पान २ वर)



## दावरवाडी आठवडी बाजारात बैलाचा साज खरेदी करताना शेतकऱ्यांची झुंबड

पैठण ।प्रतिनिधी

दावरवाडी येथील पोळा हा बैलांचा सण मानला जातो पण बळीराजा अडचणीत आलेले दीसत आहे महागाईला शेतकरी वैतागले आहेत वर्षाचा पोळा सणाला आपल्या बळीराजाला काही साज वस्तू घेण्यासाठी आज दावरवाडीच्या आठवडी बाजारात शेतकऱ्यांची झुंबड उडाली आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या सर्जा राजाला सजवण्यासाठी यसन कासरे रंगीबेरंगी बेगड आपल्या बळीराजाला शिंगाला लावण्यासाठी हिंगुळ घागर माळ अनेक वस्तू शेतकरी घेताना दिसत आहे.पण महागाईला शेतकरी संताप व्यक्त करत आहे पण नाइलाजाने शेतकरी आपल्या बळीराजाचा मालक साज घेताना दिसत आहे.

## लाच घेताना ग्रामविकास अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

अंबड ।प्रतिनिधी

जालना, (दि. २१ ऑगस्ट): रोजगार हमी योजनेतील कामाचं बिल काढण्यासाठी २५ हजारांची लाच घेताना एका ग्रामविकास अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडलं. ही कारवाई जालना-अंबड रोडवर करण्यात आली आहे.जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील तळेगाव ग्रामपंचायतीत ही घटना घडली. तक्रारदार यांनी रोजगार हमी योजने अंतर्गत पाणंद रस्त्याच्या कामाचे बिल काढण्यासाठी अर्ज केला होता. त्यांचे ११ लाख ४०




हजार रुपयांचे बिल ग्रामपंचायतीमध्ये जमा झाले होते. हे बिल देण्यासाठी ग्रामविकास अधिकारी विजय मोतीलाल शिंदे (वय ५०) यांनी ५० हजार रुपयांची लाच मागितली.

(उर्वरीत पान २ वर)

## स्थानिक गुन्हे शाखा व नेकनूर पोलीसांनी वाहनासह पकडला ४ किलो गांजा



बीड ।प्रतिनिधी

दि.२०/०८/२०२५ रोजी पो.नि. शिवाजी बंटेवाड यांनी अवैद्य धंद्यावर कारवाई करण्याचे आदेश पोउपनि महेश विघ्ने व त्यांच्या टीमला दिल्या होत्या. यावरुन पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने हे त्यांचे टीम सह केज उपविभागतील नेकणुर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनिय माहीती प्राप्त झाली की एक ईसम पांढऱ्या इंडीगो गाडीत अवेद्यरित्या गांजा घेवुन विक्री करण्याकरीता चाकरवाडी-डिघोळ अंबा रोडने येणार आहे. सदर इसमाला पोलिसांनी रंगेहात पकडून तब्बल चार किलो गांजा जप्त केला.

सदर माहीती पोउपनि महेश विप्ने यांनी पो. नि. शिवाजी बंटेवाड व नेकणुर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि

(उर्वरीत पान २ वर)


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777



सस्नेह निमंत्रण

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
6 वा वर्धापन दिन..!

शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी शिक्षक दिनी दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्राचा 6 वा वर्धापन दिन आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यासाठी आपण खास निमंत्रित आहात.

शुक्रवार, दिनांक 5 सप्टेंबर 2025
वेळ - सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत....

स्थळ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड

टीप - स्नेही जणांना विनंती आहे की, कृपया वर्धापन दिनानिमित्त शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्वीकारले जाणार नाहीत. या ऐवजी इच्छेनुसार शैक्षणिक साहित्य आणावे. आपले हे शैक्षणिक साहित्य गरजवंत होतकरू विद्यार्थ्यांना दिले जाईल... धन्यवाद...

आपलाच
वैंभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521



वाचकांना विनम्र आवाहन...!

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

रोखठोक प्रतिक्रिया पाठवण्याबाबत

दैनिक समर्थ राजयोग या शासनमान्य वृत्तपत्राचा शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी 6 वा वर्धापन दिन होत आहे. या निमित्त प्रकाशित होणाऱ्या विशेष अंकामध्ये आपण या वृत्तपत्राबद्दल आपले आलेले अनुभव, परखड मत व्यक्त करू शकता.

आपणास विनम्र विनंती आहे की, आपण कमी शब्दात आशय पूर्ण प्रतिक्रिया तात्काळ व्हाट्सअप नंबर 98 22 62 85 21 यावर आपल्या पासपोर्ट फोटोसह पाठवावी...ही विनम्र विनंती...

आपलाच
वैंभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com



जाहिरातदारांना विनम्र आवाहन...!

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

स.न.वि.वि.

मागील ५ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ६ वा वर्धापन दिन शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२५' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी

गुगल पे/फोन पे नंबर
9822628521
दै.समर्थ राजयोग
बँक : बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

जाहिरात दरपत्रक

| अ.क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- |

₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!

जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क
वैंभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



## संपादकीय

# ब्रँडचा वाजला बँड

राज्यातील बँकांपासून अनेक सहकारी संस्थांच्या निवडणुका होतात. त्यात पॅनल उभे करून संचालक मंडळावर पूर्ण वर्चस्व राहण्यासाठी अटीतटीची चुरस झालेली आपण पाहतो. पण, त्याला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न कोणी करत नाही. ठाकरे ब्रँडचा गवगवा करून राजकीय क्षेत्रात मोठे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला; महाराष्ट्रातील एका राजकीय घराण्याचा वारसा सांगणाऱ्या कुटुंबाची अशी अवस्था होईल याची महाराष्ट्रातील जनतेला अपेक्षा नव्हती. निमित्त ठरले मुंबईतील बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीचे. १९ वर्षांनंतर ठाकरे बंधू पहिल्यांदाच या निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आले. राज आणि उद्धव ठाकरे या दोन पक्षांनी युती करून यंदाची बेस्ट पतपेढीची निवडणूक लढविल्याने माध्यमाच्यादृष्टीने तो चर्चेचा विषय ठरला होता. बेस्टच्या सेवेत बहुसंख्य मराठी कर्मचारी असल्याने, ठाकरे बंधूंच्या एकीमुळे, आम्हीच निवडून येणार असल्याचा दावा त्यांच्याकडून केला होता. मात्र, संचालक पदाच्या निवडणुकीत २१ जागांपैकी एकही जागा ठाकरे बंधू जिंकू शकले नाहीत. तितका दारुण पराभव होईल, असे त्यांनाही स्वप्नात वाटले नसावे. त्यामुळे ब्रँडचा बँड वाजला असेच म्हणावे लागेल.

मराठी माणसाला कोणीही गृहीत धरू नये. मराठीचे कैवारी फक्त आम्ही असे बोलणारे आता कोणत्या बिळात लपले आहेत, अशी मंत्री नितेश राणे यांची प्रतिक्रिया बोलकी आहे. ठाकरे बंधू एकत्र आले तर महाराष्ट्रातील मराठी माणूस त्यांच्या पाठीशी उभा राहील, असे नेरिटीव्ह तयार करण्याचा प्रयत्न गेल्या तीन-चार महिन्यांपासून सुरू होता. हिंदी सक्तीच्या मुद्द्यांवरून दोघे एकत्र आल्याने मराठी माणूस हा ठाकरे कुटुंबांच्या पाठीशी आहे असे चित्र निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न माध्यमातून करण्यात आला. त्याला बेस्टमधील पतसंस्थेच्या निवडणुकीमुळे छेद बसला आहे. बेस्ट पतसंस्थेची ९ वर्षांनंतर ही निवडणूक झाली. गेले ९ वर्षं उबाठा सेनेच्या संचालकांची सत्ता होती. १५ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांनी मतदान करून या पतसंस्थेतून उबाठा सेना आणि मनसे युतीच्या एकाही संचालकाला निवडून दिले नाही. याचा अर्थ कर्मचाऱ्यांचा किती राग असेल. बेस्ट परिवहन संस्था ही डबघाईला जात असताना, कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी उबाठा सेनेच्या युनियनकडून प्रयत्न झाले नाहीत. कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन करण्यास ते अपयशी ठरले, असे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या नोकरीच्या ठिकाणचे प्रश्न असतात. प्रशासनाच्या माध्यमातून त्या प्रश्नाचे निरसन करावे लागते, ही बाब युनियनच्या नेतेमंडळींना चांगलेच ठाऊक असते. मात्र, मुंबई महापालिकेत सत्तेचे लोणी खाणाऱ्या उबाठाला कर्मचाऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या कधी कानावर आल्या असल्या तरी, त्यांना योग्य न्याय द्यावा का, असे वाटले नसावे. याच ठाकरेंच्या काळात बेस्टमध्ये खासगीकरणाचा चंचुप्रवेश झाला आणि आज त्याच खासगीकरणामुळे बेस्टचा नावलौकिक रसातळाला गेला. कंत्राटदाराच्या भल्यासाठी बेस्टला दावणीला बांधले गेले. इतके की बेस्टमधून निवृत्त झालेल्या अडीच-तीन हजार कर्मचाऱ्यांना आज आपल्याच पैशांसाठी या उतारवयात आझाद मैदानात आंदोलन करावे लागत आहे, हे पाप कोणाचे? ठाकरे बंधूंच्या उत्कर्ष पॅनेलला भोपळाही फोडता आला नाही, यातून तोच अर्थ काढावा लागेल.

मुंबईत ३०-४० वर्षांपूर्वी बेस्टमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला चांगला पगार मिळत असल्याने मराठी कुटुंबामध्ये त्याला प्रतिष्ठा होती. आता बेस्ट ही संस्था डबघाईत गेल्याचे चित्र उभे राहिले आहे. 'आंधळं दळतंय आणि कुत्र पीठ खातय', अशी अवस्था बेस्टची झालेली आहे. याला सर्वस्वी जबाबदार गेली तीस वर्षे मुंबई महानगरपालिकेसह बेस्ट प्रशासनावर सत्ता उपभोगणाऱ्या उबाठा सेनाच आहे, याची जाणीव कर्मचाऱ्यांना झालेली आहे.

## आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड येथे रविवारी आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर

बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने आणि संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली, जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेजवळ, बीड येथे रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये मनके व सांधे बदली, गुडघेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी अशा अस्थिरोगांवर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. महागड्या वैद्यकीय सेवेमुळे सर्वसामान्य रुग्णांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता अत्यल्प दरात उच्च दर्जाची सेवा देण्याचा उद्देश या शिबीरामागे आहे.या शिबिरात संपूर्ण गुडघा व खुबा प्रत्यारोपण अवघ्या ६५,००० मध्ये गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह उपलब्ध असणार आहे. तसेच, 'महा फुले जन आरोग्य योजना' अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया देखील केली जाणार आहे. याशिवाय, जे रुग्ण या योजनेसाठी पात्र नाहीत, त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत उपचार मिळवून देण्यात येणार आहेत.प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. रोहन धोत्रे (अहमदनगर) व त्यांच्या सहकारी तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. तपासणीसाठी नोंदणी शुल्क फक्त १०० असून, इच्छुकांनी मो. ८२६२००९०९१ या क्रमांकावर संपर्क साधावा. वेळेअभावी नोंदणी न करता आलेल्या रुग्णांचीही तपासणी करण्यात येणार आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटल हे आपल्या दर्जेदार वैद्यकीय सेवांसाठी राज्यभर प्रसिद्ध असून येथे १,३०० हून अधिक कर्मचारी व २५० पेक्षा जास्त तज्ज्ञ डॉक्टर कार्यरत आहेत. हजारो रुग्णांनी येथे उपचार घेऊन आरोग्य लाभले आहे.सर्व बीडकर व परिसरातील नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे सकल जैन समाज, बीड यांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

## भव्य अमृत मेळाव्याचा तरुणांनी लाभ घ्यावा - अमृत संस्था

बीड ।प्रतिनिधी

माजलगाव येथे दि. २३ ऑगस्ट रोजी भव्य 'अमृत मेळावा'शिक्षण, कौशल्य आणि व्यवसाय संधींचा अद्वितीय संगम माजलगाव (जि. बीड) -महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता वैष्णवी मंगल कार्यालय, गजानन मंदिर रोड, माजलगाव येथे भव्य 'अमृत मेळावा व परिसंवाद सत्राचे' आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात ब्राह्मण, मारवाडी, आर्य वैश्य (कोमटी), गुजराती, राजपूत, माहेश्वरी, राजपुरोहित, सिंधी, बनिया, बंगाली, पाटीदार आदी खुल्या प्रवर्गातील समाजासाठी अमृत संस्थेच्या विविध शैक्षणिक, कौशल्य विकास आणि उद्योग उभारणीसाठीच्या योजनांची माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे. मेळाव्यात णझडउ/चझडउ पूर्व परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहन अर्थसहाय्य, खखढ, खखच्, - खखचड, खखखढ सारख्या उच्च शिक्षण संस्थांसाठी सहाय्य, खत्रढ्ठ, उखझएढ, छखएड्खढ, उ-ऊ-उ यांसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांचे कौशल्य विकास कोर्सेस पूर्णपणे विनामूल्य, व्यक्तिमत्त्व विकासासाठी चघउङ चा अमृत कलश कोर्स व किशोर विकास उपक्रम, तसेच तरुणांसाठी बेकरी, सुर्यमित्र,इम्पोर्ट-एक्स्पोर्ट यांसारखी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

याशिवाय व्यवसाय कर्जावर व्याज परतावा या योजनांचा लाभही मिळणार आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (चउएऊ) मार्फत अमृतच्या लाभार्थ्यांना मोफत स्वयंरोजगार प्रशिक्षण उपलब्ध होणार असून त्यासाठी नोंदणी व मार्गदर्शन या मेळाव्यात केले जाईल. याशिवाय लहानात लहान स्वदेशी उत्पादन व सेवा जगभर पोहोचविण्यासाठी अमृत पेठ या महत्वाकांक्षी उपक्रमाची माहिती व नोंदणीही या मेळाव्यात होणार आहे.या कार्यक्रमास अमृत संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रवीण पांडे, माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर व राज्य समन्वयक दीपक जोशी उपस्थित राहणार आहेत.

हा मेळावा शिक्षणापासून व्यवसायापर्यंत आत्मनिर्भरतेकडे नेणारे एक भक्कम पाऊल ठरणार असून खुल्या प्रवर्गातील तरुणांसाठी ही सुवर्णसंधी आहे. समाजातील सर्व नागरिक व तरुणांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक विशाल अशोकराव जोशी यांनी केले आहे.

## ४४ व्या राज्यस्तरीय योगा स्पर्धेचा बीड जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा - संतोष सोहनी

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र योग असोसिएशन, बीड डिस्ट्रीक्ट. योग असोसिएशन व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग, बीड यांच्या, संयुक्त. विद्यमाने बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस, एम.आय.डी.सी. बीड येथे दि. २३, २४ ऑगस्ट २०२५ रोजी ४४ व्या राज्यस्तरीय योगा स्पोर्टस चँपियनशीप २०२५ चे आयोजन केले गेले आहे. स्पर्धात्मक योगासनांचा बीड जिल्ह्यात प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने बीड जिल्ह्यात पहिल्यांदाच अशा राज्य स्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.तरी बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्या परिवारासह सदरील स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष संतोष सोहनी यांनी केले आहे.

म्हैसूर येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगा चँपियनशीप स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ, बीड येथे होणाऱ्या ४४ व्या राज्य स्तरीय योगा स्पोर्ट्स चॅम्पियनशिप स्पर्धा मधून निवडला जाणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात झालेल्या जिल्हास्तरीय योगा स्पर्धेत आपापल्या गटामध्ये पहिले तीन क्रमांक मिळालेले मुले, मुली ,महिला, पुरुष खेळाडू या स्पर्धेसाठी स्पर्धक म्हणून बीड शहरात येणार आहेत.बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस, एम.आय.डी.सी. आकाशवाणी समोर, बीड येथे ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. दि. २२ ऑगस्ट. वार शुक्रवार रोजी सायंकाळी ०४ नंतर योग खेळाडू बीड शहरात दाखल होतील. दि. २३ ऑगस्ट २०२५ वार शनिवार रोजी सकाळी ८ वाजता स्पर्धेला तीन वेगवेगळ्या स्टेजवर सुरूवात होईल. शनिवार २३ ऑगस्ट.२०२५ रोजी सायंकाळी ०४.०० ते ६.०० या वेळेत प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत स्पर्धेचे अधिकृतरित्या उद्घाटन होईल. या उद्घाटन कार्यक्रमात महाराष्ट्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय योग खेळाडू सुंदर व आकर्षक योगा डेमो चे सादरीकरण करणार आहेत.उद्घाटन कार्यक्रम नंतर शनिवारी सायंकाळी ६.०० ते ९.०० वाजेपर्यंत स्पर्धा. चालेल. रविवारी सकाळी ८.०० ते १.०० या वेळेत स्पर्धा संपन्न.होईल. स्पर्धेचे बक्षीस वितरण रविवारी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न.होईल.



त्यानंतर सायंकाळी ५.०० ते ६.०० या वेळेत या स्पर्धेतून ५० व्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवडलेल्या महाराष्ट्राच्या संघाची घोषणा करण्यात येईल.या स्पर्धेच्या माध्यमातून बीड मध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर गेल्या दहा वर्षात योग स्पर्धेमध्ये विजयी झालेले खेळाडू येणार असून स्पर्धात्मक योगासने, पाहण्याची सुवर्णसंधी या निमिताने बीड जिल्ह्यातील नागरिकांना मिळणार आहे.बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच योगासनांची राज्यस्तरीय स्पर्धा. होत असून या स्पर्धेतून देश पातळीवर होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगासन चँपीयनशिपसाठी महाराष्ट्राचा संघ निवडला जाणारा आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्या पाल्यांसह या स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष संतोष सोहनी यांनी केले आहे.

## पाचोड पोलीस स्टेशनचे वतीने गणेश उत्सव व पोळासणा निमित्त शांतता कमिटीची बैठक संपन्न

पैठण ।प्रतिनिधी

दावरवाडी येथील पोळा व गणेश उत्सव महा लक्ष्मी या सर्व सणानिमित्त आज दावरवाडी येथे शांतता कमिटीची बैठक पाचोड पोलीस स्टेशनचे पो.सा.नि.पंडित पो. कॉन्स्टेबल संतोष चव्हाण दावरवाडी बीट पो.ना.बरबटे पोलीस पाटील एकनाथराव काशीद दावरवाडी ग्रामपंचायत सरपंच डी.डी जाधव उपसरपंच प्रशांत देशमुख संतोष जबडे विष्णू सोरमारे संतोष राठोड मल्हारी सोरमारे विलास जाधव ग्रामपंचायत चे सर्व सदस्य व गावातील नागरिक यावेळी उपस्थिती होती पाचोड पोलीस स्टेशनचे



पो.सा.नि.पंडित यांच्या आदेशानुसार शांतता कमिटीचे नियोजन करण्यात आले होते यावेळी दावरवाडी बीटचे पो. संतोष चव्हाण यांनी सर्व गावातील गणपती उत्सवानिमित्त सर्व अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना उत्सवानिमित्त मार्गदर्शन केले गणपती उत्सवाच्या दरम्यान कुठल्याही मंडळासमोर जुगार दारू पिऊन धिंगाणा जर घालत असेल तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल व त्या काळामध्ये सर्व दावरवाडी परिसरामध्ये दारू विक्रेत्यांना घोषणा देण्यात आल्या ह्या दहा दिवसांमध्ये दारू विक्री करताना आढळल्यास त्याच्यावर सुद्धा कारवाई करण्यात येईल व कुठल्याही मंडळांनी डीजे लावल्यावर त्या मंडळावर कारवाई होणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले आहे हे तिन्ही सण हिंदू धर्मातील महत्त्वाचे सण आहे हे सण शांतता मध्ये पार पाडावे असे पाचोड पोलीस स्टेशनचे चव्हाण यांनी सर्व मंडळांना सुचित करण्यात आले व गावातील दहा दिवस दारू विक्रेत्यांना सूचना देण्यात आले आहे त्या काळामध्ये कडे कोट दारूबंदी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले



**दिंद्रुड : माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे बैल पोळा सणा निमीत्त बैलांचे खांदे मळणी करण्यात गुरूवारी सायंकाळी दिंद्रुडचे ठोंबरे कुटुंब दिसत आहे.**

## पान १ वरून..

### बीड जिल्हा परिषदेच्या....

मंजूर पदे असून सर्व पदे भरलेली असल्याने शिवाजी आदमुलवाड, यांच्या जागी गिरीष बिजलवाड, यांच्या निलंबनानतर पदस्थापना पदस्थापना देण्यात आली. शिवाजी आदमुलवाड, सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, वडवणी यांची ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि. १५ मे, २०१४ नुसार प्रशासकीय कारणास्तव शिक्षण विभाग येथे वेतन व भत्यासह पदस्थापना देण्यात आली होती.

जयलाल राजपूत, सहायक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प. बीड यांच्या कामकाजाविषयी तक्रारी प्राप्त झाल्यामुळे तसेच त्यांच्या शिक्षण विभागात यापूर्वी तक्रारी प्राप्त असल्याने शिक्षण विभागात स्थानांतरणाने त्यांची पदस्थापना केली नाही. प्रशासकीय सोयीच्या दृष्टिकोणातुन अनंत खेडकर, स.प्र.अ. यांची ग्रामीण पाणी पुरवठा विभागातून शिक्षण विभाग येथे स्थानांतरण करण्यात येवून त्यांचे जागेवर जयलाल राजपूत, स.प्र.अ. यांची शासन निर्णय दि.१५ मे, २०१४ नूसार शिक्षण विभाग येथे पदस्थापना केली आहे.

सुनिल नवले, सहायक प्रशासन अधिकारी यांची शासन निर्णय दि. १५/०५/२०१४ नुसार प्रशासकीय कारणासाठी प्रशासकीय सोईच्या दृष्टीकोणातुन विभागांतर्गत स्थानांतराने त्यांची शिक्षण विभागातून सामान्य प्रशासन विभाग, जि.प. बीड येथे पदस्थापना केलेली आहे.

जयलाल राजपूत, स.प्र.अ. यांची सामान्य प्रशासन विभाग येथून पाणी पुरवठा विभागातील कार्यरत अनंत खेडकर, यांची शिक्षण विभाग येथे व शिक्षण विभाग येथील कार्यरत सुनिल नवले यांची सामान्य प्रशासन विभाग येथे प्रशासकीय सोयीच्या दृष्टिकोणातून विभागांतर्गत स्थानांतराने पदस्थापना केल्या आहेत. सदर बाब ही बदली नसून प्रशासकीय सोय करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले. सहायक प्रशासन अधिकारी संवर्गातील करण्यात आलेल्या बदल्या,पदस्थापना, स्थानांतरणाच्या प्रस्तूत कार्यालयास प्राप्त झालेल्या तक्रारी, शासन निर्णय, शासन शुध्दीपत्रक नुसार निर्णय घेण्यात आला आहे.असे जिल्हा परिषदेने नमूद केले होते.

सहाय्यक प्रशासन अधिकारी गिरीश बिजलवाड, शिक्षण विभाग, जि.प. बीड येथे कार्यरत असतांना जि.प. सेवेतून निलंबीत करण्यात आले होते. त्यांचा निलंबन कालावधी ३ महिन्यापेक्षा जास्त झाल्यामुळे सेवेत पुनःस्थापित करणे आवश्यक होते. तथापि एकूण १९ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली होती. जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर एकही रिक्त पद उपलब्ध नसल्यामुळे त्यांना पदस्थापना देण्याकरिता शिवाजी आदमुलवाड सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, वडवणी यांची शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड येथे बदली करण्यात आली होती. ३ कर्मचा-यांपैकी काही कर्मचा-यांची तक्रार असल्यामूळे स्थानांतरणाव्दारे बदल्या /पदस्थापना करण्यात केल्याचे जिल्हा परिषद अहवालावरुन दिसून आले आहे.

ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि. १५ मे, २०१४ मध्ये नमूद केल्यानूसार, नव्याने निर्माण केलेल्या पदावर किंवा सेवानिवृत्ती, पदोन्नती, राजीनामा, पदावनती, पुनःस्थापना, निलंबन यामुळे किंवा बदलीच्या परिणामस्वरुप रिक्त झालेल्या पदांवर किंवा रजेवरुन परत आले असल्यास किंवा एखाद्या कर्मचा-याविरुध्द तक्रार प्राप्त झाली असल्यास सदर तक्रारीची चौकशी करुन तसा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करणे आवश्यक होते. तथापि, तशी कोणतीही परवानगी न घेता नियबाहयरित्या शिवाजी आदमुलवाड , सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, वडवणी येथून

## पान १ वरून..

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड येथे बदली केल्याचे स्पष्ट होते.

येथील विनिर्दिष्ट तरतुदीचा अवलंब करुन सहाय्यक प्रशासन अधिकारी जयलाल राजपूत यांची सामान्य प्रशासन विभाग येथून पाणी पुरवठा विभागील कार्यरत सहाय्यक प्रशासन अधिकारी अनंत खेडकर यांची शिक्षण विभाग येथे व शिक्षण विभाग येथील कार्यरत सहाय्यक प्रशासन अधिकारी सुनिल नवले, यांची सामान्य प्रशासन विभाग येथे प्रशासकीय सोयीच्या दृष्टिकोणातून विभागांतर्गत स्थानांतराने पदस्थापना केल्याचे अहवालात नमूद केले आहे.

शासन निर्णय दि. १५/०५/२०१४ मधील प्रकरण-१ मधील ८ (७) नुसार जिल्हा परिषद एकाच विभागात ५ वर्षे सेवा झालेल्या कर्मचा-यांच्या बदल्या एका विभागातून दुस-या विभागात करण्याबाबत स्पष्ट तरतूद असतांना सूध्दा अनुक्रमे (१) जयलाल राजपूत (२) सुनिल नवले व (३) अनंत खेडकर या तिन्ही कर्मचा-यांना ते कार्यरत असलेल्या विभागात ५ वर्षे पूर्ण झालेले नसतांना त्यांचे स्थानांतरण, मध्यावधी पदस्थापनेमध्ये नियबाह्यरित्या बदल केल्याचे स्पष्ट झाले.

ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि. १५ मे, २०१४ मधील प्रकरण ५ मधील २ बदल्यांचा कालावधी यातील (दोन) मधील निर्देशानुसार तसेच शासन निर्णय दि. १५ मे, २०१४ मधील प्रकरण -५ (१) नेमणुकीचा पदावधी वाढविणे कमी करणे यातील (एक) व (दोन) नूसार विभागीय आयुक्त कार्यालयास कारणमिमांसह प्रस्ताव सादर करण्यात येवून सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर मध्यावधी बदली करणे आवश्यक होते.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि.१५ मे, २०१४ नुसार बदलीसंबंधाने कोणत्याही प्रकारची अनियमितता होऊ नये याबाबत विभागीय आयुक्त यांनी दक्षता घ्यावी. विहित पध्दतीनुसार प्रशासकीय बदल्या करणे आवश्यक आहे. अन्यथा कसूर करणारा अधिकारी हा शिस्तभंगाचा कारवाईस पात्र राहील. बदल्याबाबतच्या अनियमिमतेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने अनियमितता दूर करण्याच्या व अनियमिततेस जबाबदार असणा-याविरुध्द नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही विभागीय आयुक्त यांनी करावी, या निर्देशानुसार कारवाई करण्यात आली आहे.

सहाय्यक प्रशासन अधिकारी शिवाजी आदमुलवाड यांची नियमबाह्यरित्या केलेली बदली रद्द करण्यात येत आहे. तसेच स्थानांतराने / पदस्थापना करण्यात आलेल्या जयलाल राजपूत, सुनील नवले व अनंत खेडकर यांचा स्थानांतरण कालावधी पूर्ण झालेला नसतांना सूध्दा त्यांचा स्थानांतरणाव्दारे करण्यात आलेल्या पदस्थापना रद्द करण्यात येत असून सदर बदली / स्थानांतरण प्रक्रियेमध्ये अनियमितता करण्यास जे अधिकारी व कर्मचारी दोषी आहेत अशा जबाबदार अधिकारी व कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रस्तूत कार्यालयास १५ दिवसांचे आंत सादर करावा, असे आदेश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत.

### सावंत सरकारमध्ये ...

पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी या संदर्भातील प्रस्तावाला अंतिम स्वरूप दिले. ते दिल्लीहून बुधवारी रात्री परतले, त्यानंतर त्यांनी तवडकर आणि कामत यांचा शपथविधी होणार असल्याचे अधिकृतरीत्या

## पान १ वरून..

जाहीर केले होते. काही दिवसांपूर्वी प्रदेश भाजप अध्यक्ष दामू नाईक यांनी मंत्रिमंडळाची पुनर्रचना गणेश चतुर्थीपूर्वी केली जाईल, असे जे जाहीर केले होते त्याप्रमाणे पुढील आठवड्यात गणेश चतुर्थी असल्याने तत्पूर्वी ही पुनर्रचना केली जात असल्याचे म्हटले आहे.दिगंबर कामत आणि रमेश तवडकर यांना त्यांच्या नवीन कार्यासाठी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. शुभेच्छा देतेवेळी मुख्यमंत्री सावंत म्हणाले, कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतल्याबद्दल श्री दिगंबर कामत आणि श्री रमेश तवडकर यांचे हार्दिक अभिनंदन करतो. मला विश्वास आहे की ते गोव्याच्या विकासासाठी, प्रगतीसाठी आणि समृद्धीसाठी समर्पित भावनेने काम करतील आणि आत्मनिर्भर भारत आणि स्वयंपूर्ण गोव्याचे स्वप्न साध्य करतील.

या शपथविधी कार्यक्रमाप्रसंगी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्यासह सरकारमधील अन्य मंत्री, आमदार, भाजपचे पदाधिकारी, तसेच मडगाव आणि काणकोणमधून दोन्ही नेत्यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सुनील काकडे याचे...

शेख, राम हरी काकडे, कृष्णा शिंदे, प्रवीण शिंदे, तसेच गावातील सर्व नागरिकांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या असून गावकऱ्यांनी एकमताने सांगितले ,सुनीलचे हे यश केवळ त्याचे नाही तर संपूर्ण वरुडी गावाचे यश आहे या यशातून अनेक तरुणांना प्रेरणा मिळेल असे मत पुरुषोत्तम जोशी यांनी व्यक्त केले.

### लाच घेताना ग्रामविकास...

तक्रारदार यांना लाच द्यायची नसल्याने त्यांनी तात्काळ एसीबीशी संपर्क साधला. एसीबीने तक्रारीची पडताळणी केली असता, लाचेची मागणी खरी असल्याचे समोर आले. त्यानंतर गुरुवारी दुपारी १२.१० वाजता जालना-अंबड रोडवरील अंबड चौफुली येथे सापळा रचण्यात आला. शिंदे यांनी तक्रारदाराकडून २५ हजार रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारताच, एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले.शिंदे यांच्या झडतीत लाचेची रक्कम २५ हजार रुपयांसह ९,२५० रुपये रोख आणि एक मोबाईल फोन देखील जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पुढील तपास एसीबी करत आहे.

### स्थानिक गुन्हे शाखा....

चंद्रकांत गोसावी यांनी दिली.मा. वरीष्ठांच्या परवाणगीने स्थानिक गुन्हे शाखाचे व पो.स्टे नेकणुर चे अधिकारी अमंलदार हे दुपारी ०३.१५ वा दरम्यान चाकरवाडी-डिघोळ अंबा रोडवर नाकाबंदी करुन वाहनाची तपासणी करत असताना एक पांढऱ्या रंगाची इंडीगो गाडी जिचा वाहन क्र.चक-१४-एक-१४०३ ही नाकाबंदी बंदी दरम्याण तपासली असता सदर वाहनात दत्ता मधुकर भोजणे रा. वाघे बाभुळगाव हा हजर मिळुन आला. सदर गाडीत एकुण ०४ किलो १४० ग्रॅम वजनाचा गांजा मिळुन आला. सदर वाहन व गांजा असा एकुण ४,५०,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन ईसमनामे दत्ता मधुकर भोजणे रा. वाघे बाभुळगाव याचे विरुध्द पोलीस स्टेशन नेकणुर येथे पोउपनि महेश विघ्ने यांनी गुर.नं २२८/२०२५ कलम २०(ल), ८ (ल) छउ्झड कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स्था.गु.शा बीड व नेकणुर पोलीस करत आहेत.सदरची कामगिरी ही मा. नवनीत कॉवत, पोलीस अधिक्षक अधिक्षक बीड, मा. अपर पोलीस अधिक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. शिवाजी बंटेवाड, सपोनि चंद्रकांत गोसावी, पोउपनि महेश विघ्ने, पोहवा महेश जोगदंड, पोहवा जफर पठाण, पोहवा भागवत शेलार, पोहवा दिपक खांडेकर, पो. अं. बप्पासाहेब घोडके, पोहवा राख, पोहवा बांगर, पोहवा बळवंत,

# सौ.पुनमताई पवार लंडन येथे महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित !

## समाजसेवा हाच आपला जीवन धर्म - सौ.पुनमताई पवार

धर्माबाद / अशोक पडोळे

सद्यस्थितीत अभेद्य अशी राजकीय पार्श्वभूमी असतानाही सत्तेपेक्षा सेवेला एक आई समान प्राधान्य देणाऱ्या, अभियंत्याची अफलातून दूरदृष्टी असलेल्या, तेवढ्याच संवेदनशील हृदयाच्या व समाजसेवाच आपला जीवन धर्म मानत त्या आपल्या कार्याद्वारे सत्यात उतरणाऱ्या आमदार राजेश पवार यांच्या सुविद्य पत्नी, माजी जिल्हा परिषद सदस्या, तथा नांदेड दक्षिणच्या महिला आघाडीच्या भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा अध्यक्षा सौ.पुनमताई पवार यांना नुकताच सातासमुद्रापार लंडन येथे लोकमत महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास लोकमत समूहातील उच्चस्तरीय अधिकारी, सुप्रसिध्द सिने अभिनेता सुनील शेट्टी, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत सदरील पुरस्काराचे वितरण करण्यात आले. जिल्हा परिषदेची पहिली निवडणूक लढवताना त्या महाराष्ट्र राज्यातून दुसऱ्या क्रमांकाच्या विक्रमी मताधिक्याने विजयी होत विरोधकांच्या उरात कायमची धडकी भरवली होती. एक आमदार दोन कामदार ही भूमिका आपल्या पतीसोबत खांद्याला खांदा लावून निभावत त्यांनी अनेक समाज उपयोगी उपक्रम आपल्या जिल्हा परिषद सर्कल तथा नायगाव विधानसभा मतदारसंघात राबवले.

त्यांच्या दूरदृष्टी संकल्पनेतून नायगाव विधानसभा मतदारसंघात तब्बल ५० हजारांच्या वर लोकांच्या डोळ्यांची तपासणी करून मोफत चष्मे वाटप करण्यात आले. ओवाळीते भाऊराया या कार्यक्रमाद्वारे आपल्या मतदार संघातील सगळ्या भावांना १५हजार राख्या पाठवून त्यांनी एक विश्वविक्रमच केला. विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणास्पद




आईप्रमाणे सुरक्षा कवच ठरल्या असून आपल्या मतदारसंघात तब्बल ७५ हजारांच्या वर छत्र्याचे वाटप त्यांनी करीत हा पण एक विश्वविक्रम केला. आज घडीला नायगाव विधानसभा मतदारसंघातील तीनही तालुक्यातील प्रत्येक गावात पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे फक्त त्यांच्याच छत्र्या सर्व रस्त्यावर दिसत आहेत. नवजात प्रसुती मातांसाठी हजारो किटचे वाटप त्यांनी करत माता व बालसंगोपनाला आपल्या मतदारसंघात अनन्यसाधारण महत्त्व दिले. स्वतः इंजिनीयरची पदवी घेतलेल्या सौ.पुनमताई पवार यांची राजकीय दूरदृष्टी पण तेवढीच महत्त्वाची ठरते!

त्यांच्या उपरोक्त सर्व उपक्रमाने आमदार राजेश पवार यांच्या विजयात त्यांचा सिंहाचा वाटा ठरलेला आहे. त्यांच्या स्तुत्य उपक्रमाची यशोगाथा नायगाव मतदारसंघातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात पसरली असल्यामुळे लोकमत समूहाने या गोष्टीची आवर्जून दखल घेत सौ.पुनमताई राजेश पवार यांना लोकमत महाराष्ट्र रत्न पुरस्काराने गौरवीत केले. त्यांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे अखख्या नायगाव विधानसभा मतदारसंघात त्यांच्या चाहत्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून त्यांच्यावर कौतुकांचा व अभिनंदननाचा पाऊसच पडत आहे.

## सादोळा गाव अतिवृष्टी मध्ये घेतले नाही तर येत्या २८ तारखेला तीव्र आंदोलन - ग्रामस्थ




माजलगाव ।प्रतिनिधी

मंजरथ मंडळ अतिवृष्टी मध्ये घेण्यात यावे यासाठी आज दि.२१ गुरुवार रोजी तहसील कार्यालय येथे सादोळ्याच्या शेतकऱ्यांच्या वतीने निदर्शने केले व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.येत्या २८ तारखेला जर यांनी हे मंडळ समाविष्ट केले नाही तर आंदोलन उपोषण करण्यात येईल,असा इशारा यावेळी सादोळा येथील शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आला.

माजलगाव तालुक्यामध्ये मोठा पाऊस झालेला आहे.या पावसामुळे शेतकऱ्यांचे पिकाचे जनावरांच्या चाऱ्यांचे व यंत्रसामग्रीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे.हे नुकसानाची तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत शासनाकडून करण्यात यावी.तसेच येथील प्रशासनाने आमच्या मंडळावर गावावर एक प्रकारे अन्याय केला आहे. न्याय द्यावा या मागणीसाठी सादोळा येथील सर्व ग्रामस्थ ग्रामस्थानी तहसीलदारांना निवेदन दिले.

## जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अतंर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटु गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे, योगदानाचे मुल्यमापन होउन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे २०२३-२४ करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत खेळाडू (०१ पुरूष ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू) असे एकुण ०४ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आहेत.

२०२२ नुसार सन २०२३-२४ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दि. ०१ जुलै २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीसाठी खेळाडूची मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.

अ) गुणवंत खेळाडू :- खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व ०५ (पाच वर्षापैकी ०२ (दोन) वर्षे त्या जिल्हयाचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असावे.खेळाडूंची मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत राज्य राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमधील पुरस्कार वर्षांच्या लगतपूर्व ०५ ( पाच वर्षातील राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वरिष्ठ, कनिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा, शालेय व केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धा मधील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेण्यात येईल यापैकी उत्कृष्ट ठरणाऱ्या ०३ वर्षाच्या कामगिरीचा विचार गुणांकण कोष्ठकामध्ये करण्यात येईल. खेळाडूने स्पर्धांच्या मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सोबत सादर करणे आवश्यक आहे. खेळाडूंचा अर्ज अधिकृत जिल्हा संघटने मार्फत शिफारसीसह सादर करणे आवश्यक आहे.

अपवादात्मक परिस्थीतीत खेळाडू वैयक्तीकरित्या अर्ज सादर करू शकतील. एशियन गेम्स्, कॉमनवेल्थ गेम्स्, जागतीक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट). जागतीक चषक क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट), आशियाई अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट). राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट), युथ ऑलिंपीक गेम्स्, युथ कॉमनवेल्थ गेम्स्, युथ जागतिक आजिंक्यपद । युथ जागतिक चषक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत सहभागी खेळाडूस २०२३-२४ करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार थेट देण्यात येईल.

गुणवंत क्रीडा मार्गदर्शक :- क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्र राज्यात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असले पाहिजे व त्याने पुरस्कार वितरीत करण्यात येणाऱ्या सन २०२३-२४ वर्षात वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षात किमान वरीष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला (खेलो इंडिया) मधील राज्य ते राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदकविजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील.

नांघिक अथवा वैयक्तीक मान्यता प्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल खेळाडू अथवा राज्य / जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक पात्र असेल. विहित नमुण्यातील अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. विहीत नमूण्यातील अर्ज कार्यालयाच्या फलकावर लावण्यात आलेला आहे. बीड जिल्हयातील पात्र असलेल्या मार्गदर्शक व क्रीडा पटुंनी उपरोक्त पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज दि. ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी, मो. ९६०४९५९६७८ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीड अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

## डोईफोडवाडी येथे ह भ प व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे कीर्तन संपन्न

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथे ह भ प व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे सप्ताहाच्या पाचव्या दिवशी कीर्तन संपन्न झाले. डोईफोडवाडी येथील सप्ताहामध्ये लाड गुरुजी यांनी आम्ही वैकुंठ वाशी आलो याच कारण अशी या संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर अमृततुल्य अशा प्रकारचे कीर्तन करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी महाराज म्हणाले, संत हे परोपकारासाठी अवतारतात समाजातील वाईट चालीरीती




अंधश्रद्धा, आणि प्रगतीच्या आडवाटा मोडण्याचं काम संतांनी केलेलं आहे संत हे ऋषीमुनींनी सांगितल्याप्रमाणेच वर्तन करत असतात आणि जगाला ही चांगला मार्ग सांगतात. यावेळी महाराजांनी शिक्षण घेत असताना शिष्याने गुरुप्रती कसा भाव ठेवावा हे द्रोणाचार्य व एकलव्याचे उदाहरण देऊन सांगितले. याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित मंडळी, तरुण वर्ग, स्त्री पुरुष व सानपवाडी निवडांगवाडी खर्डेवाडी , दहिफळ वडमाऊली, कारेगव्हाण येथील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## बीज भांडवल योजनेसाठी बेरोजगार युवक युवतींनी अर्ज सादर करावेत

बीड ।प्रतिनिधी

विशेष घटक योजना (२०२५-२०२६ मध्ये साध्य झालेले लक्ष्य ८० लाभार्थी) स्वरूप:- प्रकल्प मर्यादा रु. ५००००/- पर्यंत.प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के पर्यंत अनुदान देण्यात येते व राहिलेली ५० टक्के रक्कम बँके मार्फत देण्यात येते. उदा. (२५ हजार अनुदान २५ हजार बँक रक्कम बँक कर्जावर बँकेच्या नियमा प्रमाणे व्याज आकारण्यात येते.कर्जाची परतफेड सर्वसाधरणपणे ३ वर्षात करण्याची आहे. बियाणे भांडवल योजना (२०२५-२०२६ उदिष्ट ८० लाभार्थी स्वरुप

प्रकल्प मर्यादाः ०५ लाखापर्यंत प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीजभांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ टक्के द.सा.द.शे. व्याज दराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. १०,०००/- चा समावेश आहे. बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज दर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवुन दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार तीन ते पाच वर्षाच्या आत करावी लागते.

## जिल्हा परिषद अंबाजोगाईच्या विद्यार्थ्यांचा एसआरटी वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस प्रवेश - शाळेतर्फे सत्कार

अंबाजोगाई / प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई हे आशियातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आहे. याच प्रतिष्ठित महाविद्यालयात अंबाजोगाई येथील जिल्हा परिषद माध्यमिक मुलांची छत्रपती शिवाजी महाराज चौक मराठी माध्यम शाळेचा विद्यार्थी सद्दाम अलीम शेख याने चइइड अभ्यासक्रमात प्रवेश मिळवून शाळेचा मान वाढविला आहे. यामुळे शाळेत आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमात सद्दाम शेख याचा सत्कार करण्यात आला.




या कार्यक्रमासाठी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सद्दाम शेख याला शाळेतर्फे गौरविण्यात आले. यावेळी शाळेसाठी अष्टपैलू कार्य करणाऱ्या वैशाली आकुसकर यांचाही गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनी यंदाही १४ नवीन प्रवेश करून शाळेच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलला. विशेष म्हणजे आकुसकर यांनी विद्यार्थ्यांमार्फत सादर केलेले वंदे मातरम् गीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमात मुख्याध्यापक संजयकुमार तांदळे यांनी सद्दाम शेख यांच्या जिद्दीचा व बिकट परिस्थितीत केलेल्या प्रयत्नांचा प्रेरणादायी उल्लेख केला. सद्दामने स्वतःचे अनुभव आणि ध्येय विद्यार्थ्यांसमोर मांडले. याशिवाय विद्यार्थ्यांनी हम सब एक है या संदेशावर आधारित मूक अभिनय सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

सूत्रसंचालन आकुसकर वैशाली यांनी उत्कृष्टरित्या केले. या कार्यक्रमासाठी विस्तार अधिकारी कुलकर्णी, बेसिकचे मुख्याध्यापक शिनगारे, नेहरकर, रोडे, देवकते यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्यासंखेने उपस्थित होते. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्री.पी. व्ही. चव्हाण २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, केज यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३५३ / २०२५**

शेहेनाज विरुध्द निरंक

नि. १२ सी.

**(मार्फत-अॅड.आर.ए.जोशी, गेवराई)**

अर्जदार :

१. शेहेनाज भ्र. मुस्ताक तांबोळी, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम रा. शुक्रवार पेठ, ता. केज जि. बीड

२.बाबर पि. मुस्ताक तांबोळी वय -३२ वर्षे, धंदा-व्यापार, रा. अजिसपुरा मोहल्ला केज, ता. केज जि. बीड

३. मोशिन पि. मुस्ताक तांबोळी, वय-३१ वर्षे, धंदा व्यापार, रा. अजिजपुरा मोहल्ला केज, ता.केज जि. बीड

४.अकबर पि. मुस्ताक तांबोळी वय - २८ वर्षे, धंदा -व्यापार,केज जि. बीड रा. अजिजपुरा मोहल्ला, केज, ता.

मागणी -बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत...

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत मुस्ताक काठूमियाँ तांबोळी, रा. केज ता. केज जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मुस्ताक काठूमियाँ तांबोळी यांचा मृत्यु दि. २६.१०.२०२४ रोजी अजिजपुरा, गांधी चौक, केज ता. केज. जि. बीड येथे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार नं. २ ते ४ हे मुले आहेत. मयत मुस्ताक काठूमियाँ तांबोळी यांची आई नामे जाहेदाबी काठूमियाँ तांबोळी हया पुर्वीच मयत झालेल्या आहेत. अर्जदार क. १ ते ४ यांच्या शिवाय मयतास इतर कोणीही अन्य जवळचे कायदेशीर वारस नाहीत.

मयत मुस्ताक काठूमियाँ तांबोळी यांचे निधन झाले आहे. मयताचे पश्चात शासकीय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा

घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत मुस्ताक काठूमियाँ तांबोळी यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढीले तारीख दि. २९/०९/२०२५ आहे.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,केज



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ६७८/२०२५**

**पार्वतीबाई रामभाउ पटेकर विरूध्द- निरंक**

**(मार्फत अॅड. पी एम पटेकर)**

ज्याअर्थी मयत नामे रामभाउ बुधाजी पटेकर हे दिनांक १४.११.२०२४ रोजी काठोडा, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार

१.पार्वतीबाई रामभाऊ पटेकर वय ७० वर्षे धंदा - शेती रा. काठोडा ता. गेवराई जि. बीड

२. दगडू रामभाऊ पटेकर वय ३९ वर्षे धंदा - शेती रा. काठोडा ता. गेवराई जि. बीड

३. राजेश गुलाब पटेकर वय ३२ वर्षे धंदा - शेती रा. काठोडा ता. गेवराई जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या ह घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे रामभाउ बुधाजी पटेकर रा. काठोडा ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ०४.१०.२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३१२ दि.१८.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती सायराबी बद्रु शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | शेख फर्जाना बद्रु | मुलगी | ०१.१०.१९७७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३१० दि.१९.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती सायराबी बद्रु शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | शेख रुखसाना बद्रु | मुलगी | ०७.०५.१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १९/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३०२ दि.१४.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान माजेद फयाजोद्दीन कादरी, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | माजेद फयाजोद्दीन कादरी | स्वतः | ११.१२.१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२९८ दि.१८.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान डिगांबर सिध्दु शिंदे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | सचिन डिगांबर शिंदे | मुलगा | ०५.०१.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजश्री
SAMARTH RAJYOG



# एसपी साहेब, चकलांबा पोलीस स्टेशनची खाकी फक्त हप्ते वसुली करायलाच आहे का ?

## बसस्टँडसह पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे राजरोस सुरू

चकलंबा /प्रतिनिधी

चकलांबा पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्याने डोके वर काढले असून, अवैध वाळू दारू,गुटखा यासह शासनाच्या नियमानुसार चालत असल्याचे दाखवून अवैध धंदे सर्रास सुरू आहेत.याकडे पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांनी अर्थपूर्ण पाठ फिरवली असल्याने गुन्हेगारी प्रवृती वाढत जात असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत असून कायद्याचा धाक कमी झाला आहे.

गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलिस स्टेशनच्या हद्दीत जवळपास पन्नास ते साठ गावचा कारभार येतो. यामध्ये उमापूर तिंतरवणी यासारख्या मोठ्या आणि विस्तारित सर्कलचा सहभाग आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यांनी डोके वर काढले असून देशी विदेशी दारूची विक्री करण्यात येते.शासनाने बंदी घातलेला गुटखा आजही मोठ्या प्रमाणात छुप्या मार्गाने आणला जातो आणि विक्री होतो.बऱ्याच ठिकाणी अवैध जुगार खेळला जातो तर चकलांबा सारख्या महत्वाच्या गावात शासन बंदी असताना वाळू,गुटखा, मावा, दारू, दोन नंबरचे धंदे राज रोज चकलांबा बस स्टँडवर चालवण्यात येतो. सपोनी संदीप पाटील जाणून बुजून चकलांबा गावात दुर्लक्ष करीत आहेत. पोलिस अधिकारी आणि कर्मचारी अर्थपूर्ण कानाडोळा करतात अशी चर्चा गावोगावी होत आहे.यावर कार्यवाही करण्यास का धजावत नाहीत ? हा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे.छोट्या छोट्या कारवाया करून खऱ्या अवैध धंद्यांना बगल देण्याचे काम होत आहे.जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांनी जिह्यात अवैध धंद्यांना बंद करून कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कडक पावले उचलली असली तरी तालुका आणि ग्रामीण भागातील अधिकारी मात्र झोपेचे सोंग घेत असल्याने हे अवैध धंदे फोफावले आहेत.वाळू वाहतूक , मावा , गुटका , दारू , जुगार , यामुळे अनेकांचे नुकसान झाले आहे. यापासून काहींना कॅन्सर सारखे आजार होत आहेत.दारूमुळे अनेकांचे जीव गेले आहेत.अताच्या काळातील तरुण वर्ग व्यसनाधिन होऊन आयुष्याचे वाटोळे करत आहे. जुगारामुळे अनेकांचे संसार उद्धस्त झाले असून हे कुठेतरी थांबले पाहिजे.जुगार , मटका , दारू वाळू वाहतूक बंद झाले पाहिजे अशी मागणी सपोनि संदिप पाटिल यांच्याकडे चकलांबा गावातील तरुण वर्ग व सामाजिक कार्यकर्ते अख्तर शेख यांच्याकडून होत आहे.

### सपोनी संदीप पाटील यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

यासंदर्भात चार ते पाच पत्रकार संदीप पाटील साहेबांना भेटले असता त्यांनी पत्रकारांनाच कायदा शिकवण्याची भाषा करत हे काम माझे नाही म्हणून जबाबदारी झटकून टाकली.एस पी साहेब मग हे काम कोणाचे आहे ? हे जरा जनतेला तरी कळवा.

## मातृभूमी प्रतिष्ठान कडून डॉ. दाभोळकर यांना विनम्र अभिवादन



बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ .नरेंद्र दाभोळकर यांच्या बाराव्या पुण्यतिथीनिमित्त अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य डी .जी.तांदळे व आम्रपाली साबळे यांच्या हस्ते डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमास डी.जी. तांदळे, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे,बीड शहर बचाव मंचचे निमंत्रक नितीन जायभाये, लेक लाडकी अभियान चे अध्यक्ष बाजीराव ढाकणे, श्याम मार्कंडे,शुभम मुंडे ,पत्रकार समीर काजी आदी उपस्थित होते.

## जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्त करण्याच्या मागणीसाठी 'आप' चे जिल्हा परिषदेच्या समोर 'झोप काढू' आंदोलन

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरवस्था सुधारण्यासाठी आणि त्यांना आवश्यक मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी आम आदमी पार्टी (आप) ने 'झोप काढू' आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश सचिव सुग्रीव मुंडे महाराष्ट्र सचिव या आंदोलनास आवर्जून उपस्थित राहिले व माजी सैनिक अशोक येडे, जे 'आप'चे जिल्हाध्यक्ष , यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.



'आप'च्या शिष्टमंडळाने बीड जिल्ह्यातील काही शाळांची पाहणी केली असता, त्यांना अनेक गंभीर समस्या आढळल्या. यामध्ये शाळांच्या इमारतींची खराब झालेली स्थिती, काही ठिकाणी शौचालये आणि पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, तर काही शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता अशा बाबी समोर आल्या आहेत. काही शाळा तर भाड्याच्या इमारतींमध्ये किंवा झाडांखाली भरत आहेत. सरकार या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत आहे, जणू काही ते झोपलेच आहेत.याच कारणामुळे, सरकारला जागे करण्यासाठी आणि या शाळा वाचवण्यासाठी उपाययोजना करण्याची आठवण करून देण्यासाठी २१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत 'झोप काढू' आंदोलन करण्यात आले. हे निवेदन मुख्यमंत्री, पालकमंत्री, आणि शिक्षणमंत्री यांना बीडच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत निवेदन मुख्यमंत्री, शिक्षा मंत्री, जिल्हाधिकारी,मराठवाडा आयुक्त यांना देण्यात आले. या आंदोलनात आप'चे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, सहदेव खंडागळे, कैलासचंद पालीवाल, माऊली शिंदे, भीमराव कुठे जिल्हाध्यक्ष बामसेफ नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर, नितीन जायभाय बीड शहर बचाव मंच, डीजे तांदळे सर शिक्षक संघटना, अशोक जोगदंड, संतोष जोगदंड, सय्यद सादेक, शहराध्यक्ष मिलिंद पाळणे, रफिक पठाण, कृष्णा जगताप तालुकाध्यक्ष बीड, व्यंकट मुंडे परळी राजेश देशमुख परळी शहराध्यक्ष नासिर मुंडे साहेब केज तालुका अध्यक्ष सुहास चौधरी आष्टी तालुकाध्यक्ष रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख डॉक्टर दीपक कोल्हारआणि आजम खान यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.



## रोल बॉल राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत सेंट झेवियर स्कूलच्या खेळाडूंची उत्तुंग भरारी

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १६ व १७ ऑगस्ट रोजी जिल्हा धाराशिव तालुका उमरगा येथे झालेल्या राज्यस्तरीय रोल बॉल स्पर्धेमध्ये सेंट झेवियर स्कूल बीड येथील वेदांत बळीराम कातखडे या खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेमध्ये रोल बॉल स्केटिंग बीड जिल्हा टीम या संघाने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवून जिल्ह्याचे व शाळेचे नाव लौकिक केले.

या विजयी खेळाडूंचे अभिनंदन शाळेचे प्राचार्य फादर जेम्स थोरात यांनी तोंड भरून कौतुक केले व शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

## जीवनातील गेलेला क्षण पुन्हा येत नाही पण छायाचित्राकार हा छायाचित्राच्या माध्यमातुन तो क्षण कायम टिकून ठेवतो - भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख

### भाजपच्या वतीने कडा येथील छायाचित्रकारांचा सत्कार संपन्न

कडा ।प्रतिनिधी

जीवनातील गेलेला क्षण पुन्हा येत नाही पण छायाचित्राकार हा छायाचित्राच्या माध्यमातुन तो क्षण कायम टिकून ठेवतो.जागतिक छायाचित्रकार दिना निमित्ताने बोलताना बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी आपले मत व्यक्त केले.

जागतिक छायाचित्रकार दिना निमित्ताने भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या वतीने कडा शहरातील छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला. कडा येथील भाजपा कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते बाबुलाल भंडारी, अमोलक शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा, राजु शिंदे , दिलीप परदेशी, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब देशमुख, अशोक पवळ, वेदांत देशमुख, रमेश भोजने, , हरिश्चंद्र बोडखे, पत्रकार दिगंबर बोडखे, राजेंद्र जैन, अशोक खंदारे, महेश पवळ व इतर उपस्थित होते. उपस्थित होते.

प्रारंभी फोटोग्राफर ढोले यांच्याकडील अत्यंत जुन्या काळातील व सध्या असणाऱ्या अशा दोन्ही कॅमेरांची पुजा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.सुरुवातीला कडा येथील जेष्ठ फोटोग्राफर अरुण ढोले यांचा



सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सागर ढोले,अतुल ढोले,विशाल इथापे,अशोक कुमखाले,विशाल ढोले,अंबादास जगताप,रोहन बेल्हेकर,उमेश कव्हले,किरण शिंदे,प्रेमराज साळवे,कृष्णा अब्दार,रोहित क्षिरसागर, गायकवाड,राहुल ढोले,संस्कार पगारे,शुभम साके, अंकूश चव्हाण, साठे, कांबळे व इतर उपस्थित छायाचित्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाबुलाल भंडारी, हेमंत पोखरणा यांची शुभेच्छापर भाषणे झाली.भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी सांगितले की, छायाचित्रकार हा सर्वसामान्य माणसापासून ते अति महत्वपूर्ण अशा व्यक्तींचे महत्त्वाचे क्षण कॅमेरा मध्ये बंदीस्त करण्याचे काम करतात. माणसाच्या आयुष्याची आठवणी कायम स्मरणात राहतील असे महत्वाचे क्षण टिपण्याचे प्रयत्न करतात तसेच निसर्ग चित्र सजिव वाटतील असे काम छायाचित्रकार करतात. त्यांचे हे काम खरोखरच कौतुकास्पद आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सागर ढोले यांनी केले.

## लिंबागणेश येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक संपन्न

### शिस्त आणि सौर्हादात शांततेत सण साजरे करा - पो.नि. चंद्रकांत गोसावी

लिंबागणेश ।प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सव व ईद ए मिलाद सण आनंदात व शांततेत साजरे व्हावेत यासाठी ग्रामस्थांनी कायदा व सुव्यवस्था तसेच सामाजिक सलोखा अबाधित ठेवावा, असे आवाहन नेकनूर पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी केले.

गुरुवार दि.२१ गुरूवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत अध्यक्षस्थानी ते बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.गणेश ढवळे यांनी तर आभार प्रदर्शन समीर शेख यांनी केले.गणेशोत्सव शांतता कमिटीच्या बैठकीस पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, गोविंद बडे, बालासाहेब ढाकणे,सरपंच



बालासाहेब जाधव, राजाभाऊ गिरे, कल्याण वाणी, बाळकृष्ण थोरात, चिंतामण जोशी,वरद जोशी, श्रीहरी निर्मळ,दामु थोरात, शिवाजी वाणी, पांडुरंग वाणी,समीर शेख, रमेश गायकवाड, समीर शेख, बाळासाहेब मोरे, विक्रांत वाणी, अभिजित गायकवाड, अशोक वाणी, संतोष भोसले, सुरेश ढवळे,बाळासाहेब मुळे, तुळशीराम गायकवाड,विठ्ठल कदम,अकबर सय्यद,अक्षय येडे, शिवाजी शिंदे,बंडु बागल,जीवन मुळे, सुखदेव वाणी, विकास बारगजे, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सण साजरा करा उत्साहात पण शिस्त आणि सौर्हादात - सपोनि चंद्रकांत गोसावी

गणेशोत्सव हा श्रद्धा व सामाजिक एकोप्याचा सण आहे. प्रशासन व गणेश मंडळांनी परस्पर समन्वयाने उत्सव सुरळीत पार पाडावा. यावर्षी राज्य पातळीवर गणेशोत्सव महोत्सव म्हणून साजरा होणार असल्याने ग्रामस्थांनी पर्यावरणपूरक मूर्ती, निर्माल्य विसर्जन व स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे.ध्वनी प्रदूषण, विजेची सुरक्षितता व वाहतूक व्यवस्थेचे काटेकोर पालन करावे.

गणेश मंडळांनी ऑनलाईन परवाना घेऊनच गणपती स्थापना करावी.ध्वनीक्षेपक व लाईटिंग ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणेच वापरावे, जेणेकरून लहान मुले, वयोवृद्ध व आजारी व्यक्तींना त्रास होणार नाही.गणेशोत्सव व ईद ए मिलाद हे दोन्ही सण एकात्मतेचे द्योतक असून जबाबदार नागरिक म्हणून सर्वांनी शांतता व सौहार्द टिकवावे, असे आवाहन त्यांनी केले.

## किशोरवयीन मुलां मुलींनी आरोग्य जनजागृती अभियानात सहभाग नोंदवावा - धनराज पवार

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**

**दि २० ऑगस्ट रोजी नेताजी सुभाषचंद्र माध्यमिक विद्यालय अंबाजोगाई या ठिकाणी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयचा आयसीटीसी वतीने तसेच जिल्हा प्रतिबंध व नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बीड यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई आरोग्य विभाग यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार शालेय किशोरवयीन मुलां मुलीनं साठी इंटेन्सिफाइड जनजागृती अभियान अंतर्गत एचआयव्ही एड्स जनजागृती अभियानाचे उद्घाटन करण्यात आले होते.**

यावेळी शाळेची मुख्याध्यापक श्री सतीश शिंदे सर, समन्वयक श्री चंद्रसेन खांडेकर सर व शाळेतील सर्व शिक्षक उपस्थिती होती त्या सोबतच शाळेतील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास सहभाग नोंदवला. यावेळी कार्यक्रमाची मुख्य मार्गदर्शक श्री धनराज पवार समुपदेशक स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय



वैद्यकीय महाविद्यालय यांनी उपस्थित किशोरवयीन मुलांना एच आय व्ही एड्स या आजाराबद्दल सखोल अशी माहिती दिली. एचआयव्ही एड्स हा आजार कशामुळे होतो आणि कशामुळे होत नाही याबद्दल माहिती दिली तसेच समज गैरसमज आणि सामाजिक भेदभाव मानसिक आरोग्य तसेच कायदा २०१७ याबद्दल माहिती दिली. आणि एच आय व्ही झाल्या नंतर झालेल्या रुग्णास काय उपचार केले जातात त्याबद्दल माहिती दिली. यानंतर या कार्यक्रमाबद्दल मुलांना माहिती दिली.सदरील कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री रोमन सर यांनी केले तर आभार श्रीमती पवार मॅडम यांनी केले.तसेच शाळेतील इतर सर्व शिक्षक आणि इतर कर्मचारी व मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# राहुल गिरी यांचा होणार राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने गौरव

## २३ ऑगस्ट रोजी लातूर येथे पुरस्काराचे वितरण

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेले राहुल गिरी हे आपल्या भाषण कौशल्याच्या बळावर सबंध महाराष्ट्राला परिचित आहेत.अत्यंत कमी वयात त्यांनी आपली अनोखी छाप महाराष्ट्रभर उमटवली आहे.त्यांच्या मुखातून बाहेर पडणारे पहाडी शब्द आणि त्या प्रत्येक शब्दातून प्रवाहित होणारा गहन अर्थ ऐकणा-या प्रत्येकावर राहुल गिरी यांचा प्रभाव पाडल्याशिवाय राहत नाही.आपल्या कमी वयात बीड जिल्ह्याचा नावलौकिक वाढवणाऱ्या या तरुण युवकाने आजतागायत अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत, त्यातच गोसावी समाज प्रतिष्ठान,लातूरच्या वतीने राहुल गिरी यांना यावर्षीचा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता लातूर येथील, ब्लड बँक सभागृह,गांधी मैदान येथे अत्यंत दिमाखदार सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण होणार आहे.अत्यंत सामान्य परिस्थितीतून बीड जिल्ह्याच्या ग्रामीण मातीत घडून पुढे आपल्या शैक्षणिक गुणवत्तेच्या बळावर पुणे विद्यापीठातून अ + श्रेणीतून उच्च



शिक्षण पूर्ण करत आज मराठवाड्याच्या दुष्काळा संबंधित विषयावर पीएचडी करत असलेल्या राहुल गिरी यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनात जवळपास ४०० वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांची पारितोषिके मिळवली आहेत. राष्ट्रीय हिंदी भाषण प्रतियोगितेत महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांक मिळवणारा हा तरुण महाराष्ट्र राज्याचा प्रतिनिधी म्हणून संसद भवन दिल्ली येथे आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करायला उपस्थित राहिला तेव्हा तर सबंध महाराष्ट्राचा माथा अभिमानाने उन्नत झाला होता. आजमितीला राज्यभर दररोज अनेक व्याख्यानांतून प्रबोधनाचे मौलिक कार्य राहुल गिरी पार पाडत आहेत.अत्यंत कमी वयात महाराष्ट्रभर आपला नावलौकिक मिळवून बीड जिल्ह्याच्या या भूमिपुत्राने आपले वक्तृत्व कौशल्य आणि स्वभाववैशिष्ट्ये यांमुळे अत्यंत दांडगा जनसंपर्क जमवला असून बीड वासियांची मान अभिमानाने उंचावली आहे. राज्यातल्या जवळपास सर्व प्रमुख व्याख्यानमाला आणि उंचीच्या कार्यक्रमांत राहुल गिरी यांचे विचार श्रवण करायला जमणारी गर्दी त्यांचे नावलौकिक दर्शवणारी आहे.गोसावी समाज प्रतिष्ठान,लातूर च्या वतीने राहुल गिरी यांना मिळत असलेल्या राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने त्यांच्या गौरवात अधिक भर घातली आहे. दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता लातूर येथील, ब्लड बँक सभागृह,गांधी मैदान येथे संपन्न होत असलेल्या या पुरस्कार वितरणासाठी विविध स्तरांतून राहुल गिरी यांच्यावर शुभेच्छा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## आमचा देवाभाऊ अभियानातून माजलगाव तालुक्यातील लाडक्या बहिणींच्या २८५५ राख्या

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्त

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यात 'आमचा देवाभाऊ' विशेष अभियान उत्साहात राबविण्यात आले. मा.ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या अभियानात तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांना आपले प्रेम व आपुलकी व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी अनेक महिलांनी पत्राद्वारे देखील देवा भाऊचे लाडक्या बहिणीला असलेले सहकार्य याबद्दल देवा भाऊ विषयी कृतज्ञता व्यक्त केली. खरोखरच महाराष्ट्र राज्यासाठी व महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी सुरक्षिततेसाठी सन्मानासाठी व आमच्या लाडक्या बहिणीसाठी विविध योजना देत आहेत , त्यामुळे आमचे देवा भाऊ आमच्या सर्व भगिनींसाठी एक आदर्श भाऊ आहेत अशी प्रतिक्रिया तुलसा कुलकर्णी सह विविध भगिनीं यांनी पत्राद्वारे दिली.या उपक्रमांतर्गत लाडक्या बहिणींनीकडून तब्बल २८५५ राख्या संकलित करण्यात



आल्या. संकलित राख्या बीड येथील भाजपा कार्यालयात झालेल्या विशेष कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या मार्फत मा.मंत्री बबनराव लोणीकर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या प्रसंगी भाजपा युवा नेते अक्षय मुंदडा सह जिल्ह्यातून आलेल्या मंडळ अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.या अभियानासाठी कीट्टी आडगाव मंडळ माजलगाव तालुका अध्यक्षा सौ. रूपाली कचरे, माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी, पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रिय परिश्रम घेतले. राख्या संकलन मोहिमेत श्वेता ठोसर, अनिता लोखंडे, अमृताताई, गौरीताई देशमुख, पूजा मुंडकर या बहिणींसह गणेश सातपुते, सिद्धेश्वर राठोड,कल्याण शेप, सुधाकर रासवे, मनोज कोरडे, सचिन तौर, संजय पवार, दीपक गरड, मल्हारी ढगे आदींनी विशेष योगदान दिले.हा कार्यक्रम एक वेगळा,स्तुत्य स्नेहसोहळा ठरला. या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरील बहिणींचे अपार प्रेम आणि महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास पुन्हा अधोरेखित झाला.

# बीड जिल्हा नशामुक्त करण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलाकडून विशेष मोहीम

## नशामुक्त बीड आपली जबाबदारी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याला नशामुक्त करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी एक विशेष उपक्रमाची सुरुवात केली आहे. या मोहिमेसाठी जिल्हा स्तरावर दहशतवाद विरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी रत्नाकर घोळवे यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या उपक्रमांतर्गत, अंमली पदार्थ जसे की, गांजा, अफू याची लागवड, विक्री, वाहतुक, साठा किंवा वापर तसेच नशेची औषधे व गोळ्या, सोलुशन, व्हाईटनर याचा साठा, वाहतुक, विक्री किंवा वापरासंबंधी कुठलीही माहिती नागरिकांना पोलीस विभागाला कळविता यावी यासाठी एक विशेष मोबाईल क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.तक्रारीसाठी संपर्क क्रमांक: ९२७०२४३२००तसेच नागरीक प्रोजेक्ट संवादच्या ठ उेवश वर सुद्धा आपली तक्रार नोंदवू शकतात.माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव व मोबाईल क्रमांक पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असून, कोणत्याही परिस्थितीत त्यांचा उलगडा होणार नाही, याची हमी पोलीस विभागाकडून देण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे आवाहन

बीड जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने समाजात व्यसनमुक्तीबाबत जागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, तसेच अंमली पदार्थाविषयी कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित कळवावी. आपली छोटीशी माहिती एखाद्या तरुणाचे भविष्य वाचवू शकते आणि आपल्या जिल्ह्याला नशामुक्त करण्यात मोठा हातभार लावू शकते.

# जायकवाडीतून पाण्याचा विसर्ग गोदावरीकाठच्या नागरिकांनी सतर्क रहावे - माजी मंत्री राजेश टोपे

अंबड ।प्रतिनिधी

जायकवाडी धरणातून नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने गोदावरी नदीकाठच्या रहिवाशांनी सतर्क राहावे, असे आवाहन माजी मंत्री राजेश टोपे यांनी केले आहे. जायकवाडी धरणाचे दरवाजे उघडणार!जायकवाडी धरण ९५ टक्के भरले आहे, त्यामुळे आज संध्याकाळी ६ ते ७ वाजेच्या दरम्यान धरणाचे १८ दरवाजे २ फुटांनी उघडले जाणार आहेत. यामुळे ३७,७२८ क्युसेक पाणी गोदावरी नदीत सोडले जाणार आहे. कार्यकारी अभियंता श्रीमती जगताप यांनी ही माहिती दिली आहे.

माजी मंत्री राजेश टोपे यांचे आवाहन

माजी मंत्री राजेश टोपे यांनी गोदावरी नदीकाठच्या नागरिकांना विशेषतः अंबड, घनसावंगी, परतूर, माजलगाव आणि गेवराई भागातील लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, घाबरून जाऊ नका, पण सतर्क राहा आणि प्रशासनाला सहकार्य करा. स्थानिक आपत्कालीन व्यवस्थापन टीमला सतर्क राहण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

नागरिकांना घ्यावयाची काळजी नदीपात्रात जाऊ नका. नदीकाठच्या शेतात असलेले शेतीचे साहित्य, अवजारे, विद्युत उपकरणे आणि पाळीव प्राणी सुरक्षित ठिकाणी हलवा. घरातील लहान मुले, वृद्ध आणि महिलांना सुरक्षित ठिकाणी ठेवा.गावकऱ्यांची काळजी घेण्यासाठी सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी एकत्र यावे. टोपे यांनी कोणत्याही प्रकारची जीवितहानी किंवा मालमत्तेची हानी होऊ नये यासाठी दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही समस्येसाठी जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

## डॉ. विशाल राठोड खाजगी सचिव तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लोकमताचा मानाचा बीड भूमिपुत्र पुरस्कार जाहीर

मुंबई / विलास चव्हाण

बीड जिल्ह्याच्या भूषणाचा बीड भूमिपुत्र पुरस्कार यावर्षी डॉ. विशाल राठोड, खाजगी सचिव तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जाहीर झाला आहे.लोकमत तर्फे देण्यात येणारा हा पुरस्कार आपल्या कार्यकुशलतेची, सामाजिक बांधिलकीची आणि जनतेप्रती असलेल्या निष्ठेची दखल म्हणून जाहीर करण्यात आला आहे.

डॉ. विशाल राठोड यांनी आपल्या कार्यकाळात विकासात्मक योजनांची अंमलबजावणी, शासकीय कामकाजातील पारदर्शकता, तसेच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांबाबत दाखवलेली तत्परता यामुळे प्रशासनात वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांचा आणि कार्यतत्परतेचा गौरव या पुरस्काराद्वारे करण्यात आला आहे.

बीड भूमिपुत्र पुरस्कार हा बीड जिल्ह्यातील कार्यरत व्यक्तींना मिळणारा प्रतिष्ठेचा सन्मान मानला जातो.समाजकारण, प्रशासन, कला, संस्कृती, शिक्षण आदी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.या पारितोषिकाच्या घोषणेनंतर बीड जिल्ह्यातील विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून डॉ. विशाल राठोड यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांचा हा सन्मान तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# शारीरिक शिक्षण महाविद्यालय आष्टी येथे (बी.पी.एड्.) प्रवेश प्रक्रिया चालू - प्राचार्य डॉ.बी.बी. खेमगर

आष्टी ।प्रतिनिधी

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी संचलित शारीरिक शिक्षण महाविद्यालय (बी. पी. एड्.) हे आष्टी व परिसरातील शैक्षणिक संस्थेमधील एक अग्रगण्य महाविद्यालय आहे. माजी आ. भीमरावजी धोंडे साहेब यांनी १९८३ मध्ये स्थापन केलेले हे महाविद्यालय विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण संबंधी शिक्षण देत आहे. या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी जिल्हा क्रीडा अधिकारी, तालुका क्रीडा अधिकारी, क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, विद्यार्थी कल्याण अधिकारी अशा विविध पदावर यशस्वीरित्या काम करत आहेत.

अभिमानाने सांगावे वाटेल या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले काही विद्यार्थी जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, क्रीडा संघामध्ये यशस्वी खेळाडू म्हणून आपला ठसा उमटवत आहेत. खास करून खो - खो, हॉलीबॉल, कबड्डी, धावणे तसेच मैदानी खेळ या संघाचा उल्लेख करता येईल. शारीरिक शिक्षण महाविद्यालय (बी. पी. एड्.) प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र राज्य सामायिक परीक्षा समिती (एमएचसिआयटी) मार्फत राबविली जाते. ही प्रवेश प्रक्रिया मागील एक महिन्यापासून चालू झाली आहे. यामध्ये प्रवेशासाठी घेण्यात आलेली सामूहिक



चाचणी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रासह ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्राची पडताळणी करणे, तत्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे या सर्व प्रक्रिया पूर्ण करून दि. १९ ऑगस्ट २०२५ रोजी पहिली प्रवेश फेरी प्रवेश यादी एमएचसिआयटी मार्फत जाहीर करण्यात आली आहे. शारीरिक शिक्षण महाविद्यालय, आष्टी (बी. पी. एड्.) येथे ५५ विद्यार्थी संवर्गनिहाय व विद्यार्थ्याने दिलेल्या महाविद्यालय पसंती क्रमांक नुसार वाटप झाले आहेत अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. खेमगर यांनी दिली.

शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रथम प्रवेश प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. बी. बी. खेमगर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रवेशित विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ, प्राचार्य डॉ. यू. व्ही. बनाळे, प्रा. आर. बी. ढोबळे, प्रा. रफत शेख, प्रा. वसंत खेमगर, प्रा. जफर शेख प्रवेशित विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते.



## सण-उत्सवात वाहतूक शिस्तीसाठी पोलिसांचे आवाहन

देगलूर :प्रतिनिधी

आगामी पोळा, दहीहंडी, गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद या सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर देगलूर पोलिसांनी ग्रामीण व शहरी भागातील प्रवासी वाहन चालक-मालकांना सविस्तर मार्गदर्शन केले.

या बैठकीत पोलीस निरीक्षकांनी चालकांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले. रस्त्यावर वाहने उभी करू नयेत, प्रवाशांना गैरसोय होऊ देऊ नये, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवू नयेत, मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, सर्व कागदपत्रे व गणवेशासह वाहन चालवावे, अशा सूचना देण्यात आल्या.

शासनाने बंदी घातलेल्या वस्तूंची वाहतूक न करण्यासह, शहरात संशयित व्यक्ती आल्यास तातडीने पोलिसांना कळवावे, आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना सहकार्य करावे, असेही सांगण्यात आले. नियमभंग झाल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांनी दिला.

# मा. सर्वोच्च न्यायालयाच्या डिजे बंदी कायद्याचे उल्लंघन करु नका - उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल खांबे

शहागड ।प्रतिनिधी

अबंड तालुक्यातील गोंदी पोलीस ठाणे अंतर्गत शहागड पोलिस चौकी येथे २० ऑगस्ट सायंकाळी पाच वाजता उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी गणेशोत्सव, व मराठा आरक्षण विषयी मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी ते मुंबई मराठा आरक्षण मोर्चा चर्चा झाली.

यावेळी बोलतांना उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल खांबे यांनी सांगितले की मा. सर्वोच्च न्यायालयाच्या डीजे बंदी घालण्यात आलेली असून, कायद्याचे न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन करू नका, अन्याथा सर्व पोलीस ठाणे येथे डिसिबल मशीन आलेले असून गाव व शहरी भागातील रहिवासी वस्त्यांमध्ये ५५ डिसिबलच्या वर डीजे वाजल्यास ई-चलन मशीनद्वारे दंड करण्यात येईल तसेच आरटीओ यांना पत्र लिहून डीजे क्रमांका नुसार मालकावर परवाना रद्द करून साडेतीन लाखापर्यंत दंड होऊ शकतो.यासह यांची संपूर्ण जबाबदारी मंडळ अध्यक्ष्यावर राहील याची नोंद घ्यावी, मराठा आरक्षण साठी मुंबई कडे मोर्चा जात असल्याने खबरदारी व अंतरवाली सराटी ते अबंड तालुक्यातील हद्द संपेपर्यंत महामार्गावर कशाप्रकारे उपाययोजना करता येतील यासाठी पोलीस पाटीलांना विचारणा करून चर्चा करण्यात आली, तसेच



गणेशोत्सव शांततेत व ईद पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी नागरिकांशी चर्चा केली. यावेळी गोंदी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांनी गणेश उत्सवाच्या शुभेच्छा देताना, शांततेत उत्सव साजरा करण्याचे आव्हान केले तसेच ओन्ली पोलीस ठाणे हद्दीतील प्रत्येक गावातील गणेश मंडळांनी ऑनलाइन नोंदणीकृत फॉर्म भरून गोंदी पोलीस ठाणे येथे गोपीने शाखे जमा करावा असे सांगितले. नागरिकाच्या अडी-अडचणी जाणून घेतल्या आणि गोंदी पोलीस ठाणे अगदी पोलीस पाटलांशी संवाद साधला, एक गाव एक गणपती, सांस्कृतिक गणेश मंडळ, रक्तदान शिबिर असे अनेक उपक्रम राबविण्याचे गणेश मंडळाला आव्हान करण्यात आले. कोणताही अनुसूचित प्रकार घडल्यास कायदेशीर कार्य करण्यात येणार असल्याचे सांगितले तसेच ठाण्यातील ५० लोकांवर १०७- ११० अन्वये कारवाई करण्याच्या आल्याची माहिती सांगितली. यावेळी शहागड गावाचे सरपंच रावसाहेब जोगदंड, उपसरपंच अरबाज तांबोळी, पोलीस पाटील इंद्रजीत पाटील डोमलगाव, इलियास बागवान सुखापुरी, तसेच गणेश मंडळाचे नवीन पदाधिकारी व मागील वर्षी स्थापन केलेल्या गणेश मंडळाचे सदस्य , उपनिरीक्षक हारिदास जंगले, फुलचंद हाजारे, रामदास केंद्रे यांची उपस्थिती होती.

## बाल कीर्तनकार वेदिकाताईचे मालकिन्ही (मंठा) येथे सुश्राव्य कीर्तन

हजारो श्रोत्यांची वाह वाही

मंठा प्रतिनिधी : तालुक्यातील मालकिन्ही येथे केवळ ७ वर्षाच्या वेदिका जाधवचे हजारो श्रोत्यांच्या उपस्थितीत कीर्तन संपन्न झाले आवडे देवासी ऐका तो प्रकार नामाचा उच्चार रात्रंदिन या आशयाचे अभंग एकूण चार चरण त्यांनी कीर्तनासाठी निवडले होते त्यांनी सांगितले की देव भक्तीचा भुकेला आहे ईश्वराचे नामस्मरण उठता बसता करीत राहावे तरीही ईश्वर त्याचे वर कृपा करतो वेदिकाताई म्हणाल्या प्रत्येकाच्या गळ्यात सोन्याची नव्हे तर तुळशीची माळ असली पाहिजे तसेच कपाळावर उभा गंध लावावा जेणेकरून मन बुद्धी प्रसन्न व चांगली होते वारकरी समाजात पंढरीला जाणे खूप महत्त्वाचे व मनःशांती देणारे आहे तेव्हा ज्याला ज्याला शक्य असेल त्याने पंढरपूरला अवश्य जावे केवळ सात वर्षाच्या वेदिका ताईने हे सर्व मुखोद्गत सांगावे हे खरोखर कौतुकास्पद आहे जवळपास दीड ते दोन तास चाललेल्या कीर्तनात अधून मधून ताईने काही प्रबोधनात्मक दृष्टांत दिले तर अधून मधून एखादे गमतीशीर उदाहरण देऊन उपस्थितांची वाहवाई मिळवली हश्या पिकवला उल्लेखनीय म्हणजे ताईच्या कीर्तनाला दूर दूरच्या स्त्री-पुरुषांची गर्दी होते आणि श्रोते कीर्तनात तल्लीन होतात दुसरे असे की तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यातील अनेक ठिकाणी त्यांना कीर्तनाची मागणी असते बाल वयात जर इतके उत्कृष्ट कीर्तन करणारी वेदिका ताई मोठेपणी श्रेष्ठ कीर्तनकार होईल तीळ मात्र संदेह नाही



महसूल दिन ना निमित्त भूमि अभिलेख कार्यालयातील उत्कृष्ट पुरस्कार असदखान पठाण. यांना पालम तालुक्यातील भूमी अभिलेख कक्षातील कर्तव्यदक्ष कार्यालयीन कर्मचारी असदखान पठाण यांनी शासनाच्या विविध अभिनयाद्वारे मराठा कुणबी नोंदी, पांदन रस्ता, एक दिवशी सनदी फीस विविध शासनाच्या कार्यक्रमाद्वारे तहसील व जिल्हा महसूल च्या मार्गदर्शनानुसार उत्कृष्ट काम केल्याबद्दल पालम पत्रकार वतीने दिनांक २० रोजी, सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यालयीन अधीक्षक पंडित सर, सवंडकर, मुझातब खान , महेश चोपडे, ललित तोडगिरे , देवानंद कांबळे रंजना ताटे मॅडम , अगदी जण कार्यालयात उपस्थित होते. यावेळी पत्रकार शांतीलाल शर्मा, पत्रकार राहुल गायकवाड, लक्सम गायकवाड मारोती नाईकवाडे, विलास चव्हाण, आदिजन वतीने सत्कार करण्यात आला.

# मातकुळीच्या डोंगरेंचा आकाश व्यापी ग्राफिक्स डिझाईनर प्रवास

आष्टी ।प्रतिनिधी

सध्याच्या गतिमान आणि डिजिटल युगामध्ये ग्राफिक्स डिझायनिंग मध्ये अत्युच्च वेगाने आणि विविध कल्पनेने नटलेले ग्राफिक डिझाईन्स तयार करण्यात हातखंडा असलेले आकाश डोंगरे यांच्याबाबत त्यांची प्रगती आणि प्रतिभा पाहता मातकुळीच्या डोंगरे यांचे आकाश व्यापी कर्तृत्व दिसून येत आहे. सातत्य, प्रचंड कष्ट, जिद्द, चिकाटी व सचोटीच्या जोरावर डिझाईनर झाला आहे. सच्चा मित्र, कुशल संघटक विविध क्षेत्रातील मित्रांसाठी झोकून देण्याची तयारी, मित्रांसाठी वाटेल ते कष्ट करण्याची तयारी या गुणवैशिष्ट्यामुळे आकाश युवकांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे. विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची भेट घेणे, त्यांच्याबरोबर फोटो काढणे हा आकाश चा आवडता छंद असून दै. झुंजार नेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांनी आकाशचा हा छंद जोपासण्यास प्रभावीपणे मदत केलेली आहे.



कामाशी निष्ठा आणि प्रचंड मेहनत यामुळे आकाश डोंगरे यांनी आष्टी तालुक्यात ग्राफिक्स क्षेत्रामध्ये आपले नाव अधोरेखित केले आहे. स्वतःच्या कुटुंबासह मातकुळी गावाचा नावलौकिक वाढविला. कलेच्या माध्यमातून नवा अध्याय रचणारा कलावंत आकाशचा नामोल्लेख करणे कर्म प्राप्त आहे. आष्टी तालुक्यातील मातकुळीसारख्या छोट्याशा खेड्यात जन्मलेल्या तरुण कलावंत डिझाईनर आकाश डोंगरे याने आपल्या कलेच्या व कष्टाच्या जोरावर यशाचे आणि ग्राहकाच्या पसंतीचे शिखर केले आहे. अगदी लहानपणा पासूनच संघर्षाची बीजे नसानसात भिनलेल्या अत्यंत परिश्रमपूर्वक कार्य करत प्रतिकूल परिस्थितीतून चिखलाच्या दलदलीतून सुंदर कमलपुष्प निर्माण करण्याची किमया मातकुळीतील डोंगरे कुंटुबातील या जिगरबाज कलाकाराने यशस्वी करून दाखवली आहे.आकाशचा जन्म दि. २२ ऑगस्ट १९९७ मध्ये गरीब शेतकरी कुटुंबात झाला. कोणताही कलाकार हा स्वछंदी आणि मुक्त स्वभावाचाच असतो. डिझाईनर आकाश डोंगरे हाही त्यातीलच एक. बोडखे प्रेसमध्ये हा फक्त डिझाईनरच नाही तर दत्ताभाऊ बोडखे यांचा विश्वासु साथीदार आहे. अत्यंत वेगवान बोटांची हालचाल. त्यातुनच उत्कृष्ट डिझाईनची निर्मिती करणारा हा स्वछंदी कलावंत. शालेय शिक्षण जि. प. प्रशाला मातकुळी व माध्यमिक शिक्षण श्रीकृष्ण विद्यालय मातकुळी येथे तर महाविद्यालयीन शिक्षण आष्टी शहरातील भगवान महाविद्यालयात झाले. त्यानंतर बहिस्थ विद्यार्थी राहून पदवी घेतली. शिक्षण घेत असतानाच आकाशने जामखेड व अहमदनगर येथे आवडीचे क्षेत्र असलेल्या ग्राफीक्स या क्षेत्रात पदार्पण केले. प्रदीर्घ अनुभवाची शिदोरी सोबत घेवून आष्टी येथे आकाश डोंगरे हे ग्राफिक्स दुनियात प्रभावीपणे काम सुरु केलेले आहे. आकाश डोंगरे याने अंत्यत प्रतिकुल परिस्थितीमध्ये आपल्या कुंटुबाची जबाबदारी यशस्वीपणे पेलुन कलेच्या माध्यमातून आपल्या कार्याचा ठसा उमटविला. कलेचा प्रवास आकाशला नामांकीत कलावंत इथपर्यत घेऊन आला आहे. डिझाईनर आकाश डोंगरे यांना वाढदिवसाच्या राजेंद्र लाड व दै. समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने हार्दिक शुभेच्छा...!!!

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, वडवणी शहराध्यक्ष पदी श्री. गणेश नवनाथ म्हेत्रे यांची निवड

वडवणी ।प्रतिनिधी

आज वडवणी शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री. गणेश नवनाथ म्हेत्रे यांची आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या सुचनेनुसार वडवणी शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली..ही नियुक्ती माजलगाव मतदारसंघाचे लोकप्रिय युवा नेते मा. जयसिंग भैय्या सोळंके यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करून करण्यात आली.

या सोहळ्यास वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप,तालुकाध्यक्ष बजरंग आप्पा साबळे, युवक तालुकाध्यक्ष विकास मुंडे, युवा नेते बाबरी मुंडे, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी जि.प. सदस्य नवनाथ म्हेत्रे व सर्जेराव आळणे, युवा नेते भारतदादा जगताप, माजी उपसभापती संदिपान आप्पा खळगे, बाजार समिती संचालक सचिन भैय्या लंगडे, अभिमान कदम, गटनेते अस्लम भैय्या कुरेशी, नगरसेवक गुरु प्रसाद माळवदे, नगरसेवक पप्पू ढोले, माजी सभापती महादेव



आंबुरे, माजी सरपंच अंगद घुगे, सरपंच दिनकर कराडे, नगरसेवक नागेश डिगे, नगरसेवक बाबा वाघमारे, युवा नेते सतिष खोटे, संचालक नारायण शेळके, संचालक बबन मांजरे, संचालक भिकाराम साळवे, गोविंद बादाडे , राहुल टकले, गुरुप्रसाद डिगे, अभिषेक गुरुसाळी यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

श्री. गणेश नवनाथ म्हेत्रे यांच्या नेतृत्वात शहरात पक्षाचे संघटन, युवकांचा सशक्त सहभाग आणि सामाजिक ऐक्य यासाठी नवनवीन कामांची गती वाढेल.या निवडीबद्दल श्री. गणेश नवनाथ म्हेत्रे यांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

# जागतिक छायाचित्र दिनानिमित्त आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने महाकाय कॅमेऱ्याचे पूजन



आष्टी ।प्रतिनिधी

मंगळावर दिनांक १९ ऑगस्ट रोजी जागतिक छायाचित्र दिनानिमित्त आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने तब्बल १२ फुटी महाकाय कॅमेऱ्याचे पूजन करून जागतिक छायाचित्र दिन साजरा करण्यात आला.आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने दरवर्षी विविध उपक्रम राबवून हा दिवस साजरा करण्यात येतो. यंदा १२ फूट उंचीच्या कॅमेराची प्रतिकृती साकारून तालुक्यातील शंभरहून अधिक फोटोग्राफर बांधवांच्या तसेच युवा नेतृत्व जयदत्त धस यांच्या उपस्थितीत हा अविस्मरणीय सोहळा संपन्न झाला. यावेळी आधुनिक काळासोबत नवनवीन तंत्रज्ञानांची जोड देऊन या व्यवसायाने भरारी घेतली असून यामध्ये आता स्पेशलायझेशन देखील झाल्याने ज्याच्या नजरेची तीक्षता आणि बौद्धिक कल्पकता आहे असाच फोटोग्राफर तो क्षण टिपण्याचा प्रयत्न करतो. शिवाय आपल्या आयुष्यातील क्षण साठवून ठेवण्याचं काम आपण करत असतो त्यामुळे सर्वांनी या कलेला व्यावसायिक रूप न देता कलेप्रती आदर दाखवून ही कला जोपासली तर आपली आर्थिक उन्नती देखील आपोआप होत राहते असे मत सर्व उपस्थित फोटोग्राफर बांधवांनी व्यक्त केले. यावेळी तालुक्यातील आजी - माजी फोटोग्राफर, व्हिडिओग्रफार मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

# प्रत्यक्ष पाणी मेहकरी धरणात पोहोचताच परिसरातील ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून जलपूजन;आ.धस यांचे मानले आभार

## शेतकऱ्यांचे हित साधण्यासाठी केलेल्या या प्रयत्नाने समाधान - आ.सुरेश धस

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर येताना दिसत आहे. आ. सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे मेहकरी मध्यम प्रकल्पात पाणी सोडण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून दि. २१ रोजी सकाळी ९.४५ वा. सीना मध्यम प्रकल्पातून दोन्ही पंपाद्वारे सुमारे १६० क्यूसेक पाणी सोडले गेले असता प्रत्यक्ष पाणी मेहकरी मध्यम प्रकल्पात पोहोचताच परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी बांधवांनी जलपूजन करून आनंद व्यक्त करत आ. सुरेश धस यांचे आभार मानले.

यंदा सीना मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला असुन परिणामी अतिरिक्त पाणी नदीद्वारे वाहून जात होते. या पार्श्वभूमीवर आष्टी मतदारसंघाला या पाण्याचा लाभ



मिळावा, यासाठी आमदार धस यांनी सातत्याने पाठपुरावा करून त्यास प्रतिसाद देत प्रशासनाने तातडीने आवश्यक तांत्रिक प्रक्रिया व दुरुस्ती पूर्ण करून याशिवाय थकीत असलेले ३६ लाख ८४ हजार रुपयांचे वीजबिलही भरले गेले. मेहकरी धरणात पाणी सोडण्याचा मार्ग मोकळा झाल्याने गुरुवारी दि. २१ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष पाणी मेहकरी मध्यम प्रकल्पात पोहोचताच परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी बांधवांनी जलपूजन करून आनंद व्यक्त केला.

या संपूर्ण प्रक्रियेत पुणे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ गुनाळे, कार्यकारी अभियंता धाराशिव मध्यम प्रकल्प विभाग, धाराशिव, कार्यकारी अभियंता उजनी जलविद्युत विभाग, इंदापूर, कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग, बीड, कार्यकारी अभियंता सीना मध्यम प्रकल्प, उपकार्यकारी अभियंता पालवनकर, उपअभियंता आडे तसेच विद्युत व यांत्रिकीकरण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी महत्त्वाचे सहकार्य केले. आ. सुरेश धस यांचे परिसरातील ग्रामस्थांकडून आभार मानत समाधान व्यक्त केले.

यावेळी नवनाथ जगताप, कानडी खु. सरपंच कारभारी गव्हाणे, घोंगडे वाडी सरपंच भाऊसाहेब घोडके, उपसरपंच बश्री अशोक खराडे, पंडित पोकळे, गणप्रमुख राहुल सुरवसे गणप्रमुख अतुल खराडे, सीताराम झांजे, संजय माळशिखरे, दत्तोबा घोडके, शेख खाजा, अजिनाथ गावडे, अनिल माळशिखरे, यांच्यासह कानडी खुर्द, पिंपळगाव दाणी, मेहेकरी, पुंडी, वाहिरा येथील ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते. या सर्वांच्या हस्ते जलपूजन करून फुले व श्रीफळ अर्पण करून आनंद साजरा करण्यात आला.

शेतकऱ्यांचे हित साधण्यासाठी केलेल्या या प्रयत्नाने समाधान - आ. सुरेश धस

या पाण्यामुळे मेहकरी धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होईल आणि स्थानिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा दिलासा मिळेल. शेतकऱ्यांचे हित साधण्यासाठी केलेल्या या प्रयत्नाचे समाधान मला आहे. समाजाप्रती असलेली जबाबदारी लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या हिताच्या प्रत्येक प्रश्नावर मी सातत्याने ठामपणे उभा आहे. मी मतदार संघातील शेतकऱ्याच्या प्रत्येक प्रश्नासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी बोलताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

# शेख नजीर अहमद यांची ऑल इंडिया उलमा बोर्ड दिल्लीच्या मराठवाडा अध्यक्षपदी नियुक्ती



## मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाची लाट

परळी ।प्रतिनिधी

ऑल इंडिया उलमा बोर्ड दिल्लीच्या शिक्षण विभागाने मराठवाडा अध्यक्षपदी शेख नजीर अहमद यांची नियुक्ती केली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे ही नियुक्ती विशेष महत्त्वाची मानली जात आहे. या नियुक्तीमुळे संपूर्ण मराठवाड्यात आनंदाची लाट पसरली असून, शिक्षण क्षेत्रात नव्या प्रगतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शेख नजीर अहमद यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

२००० च्या दशकापासून शेख नजीर अहमद यांनी उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम, पुस्तक प्रदर्शन, स्पर्धा परीक्षा तयारी, गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ, मोफत शैक्षणिक सल्ला, आधार कार्ड मोफत कॅम्प यांसारख्या अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवेचा आदर्श ठेवला आहे. त्यांच्या या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली आहे. याशिवाय, त्यांनी सामाजिक समस्यांवर उपाययोजना करत वंचित वर्गाला शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत.

नियुक्तीमुळे मराठवाड्यात उत्साह

शेख नजीर अहमद यांच्या नियुक्तीने मराठवाड्यातील शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण क्षेत्रात नवे उपक्रम आणि सुधारणा घडतील, अशी अपेक्षा आहे. या नियुक्तीमुळे विशेषतः उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना आणि वंचित समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अधिक प्रभावी पावले उचलली जाण्याची शक्यता आहे.

शेख नजीर अहमद यांचा संदेश

नियुक्तीनंतर शेख नजीर अहमद यांनी सांगितले, ऑल इंडिया उलमा बोर्ड दिल्लीने माझ्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. मी या संधीचा उपयोग वंचित वर्गाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी अथक परिश्रम करेन. त्यांनी ऑल इंडिया उलमा बोर्डचे नाजेम उमेमी आलम बनी हस्नी साहेब, बोर्डचे कौमी सदर मौलाना नौशाद सिद्दिकी साहेब, एज्युकेशन विंगच्या प्रमुख प्रिन्सिपल शबाना खान आणि महाराष्ट्र रियासत शोभा तालीमच्या सदर प्रिन्सिपल डॉ. झेबा मलिक साहेबा यांचे आभार मानले.

मराठवाड्याच्या शैक्षणिक भवितव्यासाठी नवा अध्याय

# शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील लोणी ते गंगा सावंगी टोल नाका तात्काळ बंद करा





## मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके

परतूर ।प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ वरील लोणी-गंगा सावंगी दरम्यान रस्त्याचे ४० टक्के काम अपूर्ण, रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य, धोकादायक प्रवास तरी देखील येथे टोल वसुली सुरू आहे. हा वाहनचालक व नागरिकांवरील उघड अन्याय असून, हा टोलनाका तात्काळ बंद करण्यात यावा, अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली.

सोळंके यांनी म्हटले आहे की, मेघा इंजिनिअरिंग कंपनीने निकृष्ट काम केले असून अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली. अवैध खनिज उत्खनन प्रकरणात महसूल विभागाने कोट्यवधींचा दंड ठोठावला होता; पण तोही माफ करण्यात आला. रस्त्याला भेगा, खोल खड्डे, अपूर्ण पूल यामुळे जनतेचे हाल होत आहेत. श्रिष्टी नदीवरील अपूर्ण पुलामुळे मागच्या आठवड्यात राष्ट्रीय महामार्ग तब्बल २४ तास बंद होता. तसेच बीड जिल्ह्यातील केज ते धारूर येथे या राष्ट्रीय महामार्गावर टोल नाका उभारला होता परंतु जनतेने आंदोलन करून तो बंद पाडला आहे, कारण केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनीसुद्धा रस्ता दर्जेदार आणि पूर्ण नसताना टोल आकारणी चुकीची असे स्पष्ट केले होते. तरीदेखील शासन व विभागीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष सुरू असल्याचा आरोप मनसेने केला आहे.

मनसेने इशारा दिला आहे की, लोणी ते गंगा सावंगी टोलनाका तात्काळ बंद झाला नाही, तर पक्ष कार्यकर्ते स्वतः आंदोलन करून टोल बंद करतील.

# घरगुती कारणावरुन युवकाचा निर्घृण खून

परळी / प्रतिनिधी

परळी तालुक्यातील जळगव्हाण येथील रत्ननगर तांडा येथील रहिवासी असलेल्या भीमराव शिवाजी राठोड (वय अंदाजे २६) याची घरगूती प्रकरणातून निघृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपी अनिल बाबासाहेब चव्हाण याने भीमरावच्या डोक्यात कोयत्याने वार करुन त्याची हत्या केली. ही घटना जळगव्हाण येथील रत्ननगर तांडा येथे घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, अनिल चव्हाण आणि मयत भीमराव राठोड यांच्यात घरगुतीत वाद होता. हा वाद अनेक दिवसांपासून सुरु होता. अनिल चव्हाण याने याच वादातून भीमरावला संपवण्याचा कट रचला. घटनेच्या दिवशी, अनिलने भीमरावला रत्ननगर तांडा, जळगव्हाण येथे बोलावले. त्यांच्यात पुन्हा एकदा याच विषयावर जोरदार बाचाबाची झाली, जी नंतर हाणामारीत बदलली. यावेळी अनिलने जवळच असलेला कोयता उचलून भीमरावच्या डोक्यात अनेक वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या भीमरावचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी अनिल चव्हाण घटनास्थळावरून फरार झाला आहे.या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पंचनामा करुन मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी अनिल चव्हाणचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.



नूतन जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी स्विकारला पदभार

परभणी,(प्रतिनिधी) : नूतन जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी गुरुवारी (दि.२१) जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्विकारला. मावळते जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी गुरुवारी सकाळी चव्हाण यांचे जिल्हाधिकारी कार्यालयात स्वागत केले व नूतन जिल्हाधिकारी पदाचा पदभार सुपूर्त केला.

# भारतीय हज यात्रेकरुंच्या गंभीर अडीअडचणी तात्काळ दूर करा : खासदार श्रीमती फौजिया खान यांचे केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरण रिजिजू यांना निवेदन

परभणी,(प्रतिनिधी) : हज यात्रेस गेलेल्या भारतीय यात्रेकरुंना काही ठिकाणी गंभीर अडी अडचणींना सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे या यात्रेकरुंसमोर उद्भवलेल्या समस्यांची तातडीने दखल घेऊन केंद्र सरकारने त्या अडीअडचणी दूर कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार श्रीमती फौजिया तहेसीन अहेमद खान यांनी केली.

केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरण रिजिजू यांची नवी दिल्लीत खासदार श्रीमती खान यांनी भेट घेऊन मंत्री महोदयांना हज यात्रेकरुंसमोर उद्भवलेल्या समस्या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिल्या. भारतीय हज यात्रेकरूंना विशेषतः मिना व अराफात येथील मुक्कामाच्या काळात अतिशय




हालअपेष्टा व असुविधांचा सामना करावा लागला. अनेक यात्रेकरूंच्या कथनानुसार इतर देशांतील यात्रेकरूंना तुलनेने चांगल्या सुविधा मिळाल्या, तर भारतीय यात्रेकरूंना दिलेल्या सोयी अतिशय दयनीय स्थितीत होत्या. राहण्याच्या सुविधांची अवस्था अत्यंत चिंताजनक होती. सुमारे २०० यात्रेकरुंसाठी असलेल्या तंबूमध्ये ३०० हून अधिक यात्रेकरुंना कोंबण्यात आले होते. त्यामुळे अनेकांना गर्दीने भरलेल्या व उष्ण अशा मार्गांमध्ये झोपावे लागले, ज्यामुळे त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागला.मूलभूत गरजांच्या सोयीही अतिशय अपुर्या होत्या. एका मकतब मध्ये जवळपास ४,००० यात्रेकरू असूनसुद्धा, केवळ १६ स्वच्छतागृहे पुरुषांसाठी व १६ स्वच्छतागृहे महिलांसाठी उपलब्ध होती. ती देखील अस्वच्छ व अपुरी स्वच्छता झालेली होती, असे श्रीमती खान यांनी निदर्शनास आणून दिले.याशिवाय, यात्रेकरूंना मार्गदर्शन करणारा गाईड बहुतेक वेळ अनुपस्थित होता. कर्मचार्यांचा वागणूकही उद्धट व अपमानकारक असल्याचे अनेकांनी सांगितले. पुरविण्यात आलेले भोजनही ना चांगल्या प्रतीचे होते, ना पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाले, असेही श्रीमती खान यांनी या निवेदनातून म्हटले.



आष्टी न्यायालयातील सुप्रसिद्ध विधिज्ञ श्री. बाळासाहेब मोरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना श्री. शहादेव (पिनुशेठ) धनवडे, श्री. प्रा. बबन उकले, पत्रकार श्री. शरद रेडेकर (मामा), श्री. नागेश कारंडे दिसत आहेत

# जीवनातील गेलेला क्षण पुन्हा येत नाही पण छायाचित्राकार हा छायाचित्राच्या माध्यमातुन तो क्षण कायम टिकून ठेवतो - शंकर देशमुख

## भाजपच्या वतीने कडा येथील छायाचित्रकारांचा सत्कार संपन्न

आष्टी ।प्रतिनिधी

जीवनातील गेलेला क्षण पुन्हा येत नाही पण छायाचित्राकार हा छायाचित्राच्या माध्यमातुन तो क्षण कायम टिकून ठेवतो. जागतिक छायाचित्रकार दिनानिमित्ताने बोलताना बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले. जागतिक छायाचित्रकार दिनानिमित्ताने भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या वतीने कडा शहरातील छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला.

कडा येथील भाजपा कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते बाबुलाल भंडारी, अमोलक शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा, राजु शिंदे, दिलीप परदेशी, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब देशमुख, अशोक पवळ, वेदांत देशमुख, रमेश भोजने, हरिश्चंद्र बोडखे, पत्रकार दिगंबर बोडखे, राजेंद्र जैन, अशोक खंदारे, महेश पवळ व इतर उपस्थित होते.

प्रारंभी फोटोग्राफर ढोले यांच्याकडील अत्यंत जुन्या काळातील व सध्या असणाऱ्या अशा दोन्ही कॅमेरांची पुजा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. सुरुवातीला कडा येथील जेष्ठ फोटोग्राफर अरुण ढोले यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सागर ढोले, अतुल ढोले, विशाल इथापे, अशोक कुमखाले, विशाल ढोले, अंबादास जगताप, रोहन बेल्हेकर, उमेश कव्हले, किरण शिंदे, प्रेमराज साळवे, कृष्णा अब्दार, रोहित क्षिरसागर, गायकवाड, राहुल ढोले, संस्कार पगारे, शुभम साके, अंकुश चव्हाण, साठे, कांबळे व इतर उपस्थित छायाचित्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाबुलाल भंडारी, हेमंत पोखरणा यांची शुभेच्छापर भाषणे झाली.



भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी सांगितले की, छायाचित्रकार हा सर्वसामान्य माणसापासून ते अति महत्वपूर्ण अशा व्यक्तींचे महत्त्वाचे क्षण कॅमेरा मध्ये बंदीस्त करण्याचे काम करतात. माणसाच्या आयुष्याची आठवणी कायम स्मरणात राहतील असे महत्वाचे क्षण टिपण्याचे प्रयत्न

# डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यव्यापी अधिवेशनासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे - प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

मुंबई ।प्रतिनिधी

१४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली होत असुन या राज्यव्यापी अधिवेशनासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषदेचे जाळे निर्माण करण्याचं काम आम्ही घेतलं आहे. राज्यातील जवळपास ३० जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यकारिणीच्या निवडी जाहीर केल्या गेल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांत सुध्दा डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा पदाधिकारी निवडी संदर्भात यंत्रणा उभी केली गेली आहे. महत्वाचे म्हणजे या राज्यव्यापी अधिवेशनात परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणाऱ्या अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश असल्याच्या सुचना परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांनी दिल्या आहेत.१४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता एकनाथ रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं देखील आयोजित केली आहेत. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणाऱ्या दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार आहे. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणा-या संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल.



डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही.अधिवेशनात राज्य कार्यकारिणी सुध्दा निवडली जाणार असल्याचे मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांनी आदेशीत केले आहे. डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चँनल्स तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख केला गेला नाही. ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत.

प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत.त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे. त्यामुळे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या संलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्य पदाधिकारी तसेच जिल्हाध्यक्ष व तालुका अध्यक्ष यांनी सुध्दा आपल्या जिल्ह्यातील व तालुक्यातील सर्वांसोबत संपर्क साधावा व सर्वांना सोबत घेऊन

जिल्हास्तरीय कार्यकारिणी, तालुका स्तरावर असलेल्या कार्यकारिणी मधील पदाधिकारी व सदस्यांनी या महत्वपूर्ण असलेल्या राज्यव्यापी अधिवेशनात सहभागी व्हावे

# राकेश बोडखे यांची माध्यमिक शिक्षक पदावर निवड

आष्टी ।प्रतिनिधी

पवित्र पोर्टल फेस दोन मधून मुलाखती मधून राकेश उत्तम बोडखे यांची लोकमान्य शिक्षण संस्थेत माध्यमिक शिक्षक पदावर निवड झाल्याबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. शासनाने पवित्र प्रणाली २०२४ मध्ये शिक्षकांची भरती टेट सीईटी व्दारे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीना मेरीटनुसार शिक्षक भरती केली होती. सन २०१०, सन २०१४ नंतर सन २०२४ साली प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची भरती केली होती. त्यामध्ये राकेश बोडखे (एम. एस्सी, बी. एड.) शैक्षणिक आहर्ता असलेल्या तरुणाची पवित्र पोर्टल फेज १ अंतर्गत सातारा जि. प. मध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून मार्च २०२४ रोजी निवड झाली होती. त्यानंतर पोर्टल फेज २ अंतर्गत राकेश बोडखे यांना शैक्षणिक आहर्तेनुसार माध्यमिक गटात जाण्यासाठी संधी देण्यात आली. सुदैवाने बीड जिल्ह्यातील लोकमान्य शिक्षण संस्थेची एकमेव पोर्टलवर जाहिरात होती.



त्यानुसार लोकमान्य शिक्षण या संस्थेला प्राधान्यक्रम देण्यात आला होता.

संस्थाध्यक्ष ड. हनुमंत थोरवे यांनी राकेश बोडखे यांची गणित व विज्ञान विषयाचे माध्यमिक शिक्षक म्हणून निवड केली. राकेश बोडखे यांचे प्राचार्य रविकांत सुंबरे, प्राध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी स्वागत करुन अभिनंदन केले. राकेश बोडखे सर हे अत्यंत हुशार बुद्धिमान आणि शिक्षण क्षेत्राची आवड असलेले व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी प्रचंड अभ्यास मेहनत आणि जिद्दीच्या बळावर टेट परीक्षेत गुण प्राप्त केले. विद्यार्थ्यांना शिक्षणातून मूल्यात्मक शिक्षण देऊन राष्ट्रप्रेम राष्ट्र जागृती आणि समता, बंधुत्व, ऐक्य सर्व धर्म समभाव त्या मूल्यांची जोपासना करण्यावर त्यांचा भर असतो.

लोकमान्य शिक्षण संस्थेत झालेल्या निवडीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले असून भविष्यात शाळेचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वगुणसंपन्नतेवर आपण भर देणार असून संस्कारमय शिक्षणासाठी आपण प्रयत्न करू असा विश्वास यावेळी नूतन शिक्षक राकेश बोडखे यांनी व्यक्त केला आहे.

राकेश बोडखे हे आष्टी शहरातील असुन हे यश आपल्या अथक परिश्रमाने, योग्य नियोजनाने प्राप्त केले आहे. त्यांच्या या निवडीमुळे परिसरातील अनेक तरुणांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत. शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर, मित्रमंडळी आणि त्यांचे नातेवाईक सोशल मीडिया आणि इतर माध्यमांद्वारे त्यांचे अभिनंदन करत आहेत.

# शाळेत जाण्यासाठी धलपेवस्तीवरील विद्यार्थ्यांना करावी लागते कसरत

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा नगरपंचायतच्या हद्दीतील बेलेवाडी परिसरात असलेल्या धलपे वस्ती येथील २ किलो मीटर रस्त्याची दुरवस्था झाली आहे. वस्ती साठी जाणाऱ्या येणाऱ्या रस्त्याची पावसाच्या पाण्यामुळे वाट लागलेली असुन शाळेतील मुलांची शाळेत जा ये करण्यासाठी मोठी गैरसोय होत आहे.शाळेत जाताना चिकखलातुन वाट कढावी लागत आहे.

धलपे वस्तीवरील चिमुकल्यांना तारेवरची कसरत करी बेलेवाडी येथे एक ते दिड किमीमिटर चिखलाची वाट तुडवित शिक्षण घेण्याची वेळ आलेली असुन या नेहमीच्या गैरसोयीला शेतकरी विद्यार्थी व



पालक कमालीचे वैतागले असुन पावसाळ्यात तर विद्यार्थ्यांना या रस्त्याने चालणेही मुष्कील असुन सतत पाय घसरुन पडणे, चिखलाने दप्तर, बुट, चप्पल भरने या गोष्टी नेहमीच्या झालेल्या असुन सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने शेतकरी तथा मजुरांची या रस्त्याने जा ये करण्याची वर्दळ वाढलेली आहे. तर सध्या शेतात खरीप हंगाम सुरु असुन शेतकरी वाहनाने खत,बी-बियाने,शेतीची अवजारे ने आण करण्याचे काम करीत आहे. मात्र चिखल पाण्यातुन वाट काढत व कसरत करीत ते हा रस्ता कसाबसा पार करवा लागतो. तसेच या रस्त्यावर सतत लहान मोठे अपघात होत असतात.

बेलेवाडी धलपे वस्तीवर जाने-येणे करण्यासाठी निटनेटका रस्ता नसुन यात शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिकनुकसान होत आहे.या रस्तेकडे त्वरीत लक्ष देवुन या रस्त्यांचे काम हाती घ्यावे ,वैभव धलपे नागरिक

# मराठा मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या ; खा. बजरंग सोनवणे यांनी घेतली केंद्रीय मंत्री नितीन गडकरी भेट

बीड/प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे,या साठी मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई मोर्चा निमित्त बीड जिल्ह्यासह राज्यभरा तून मुंबईकडे लाखो वाहने येणार आहेत.या वाहनांमधून युवक, शेतकरी,कष्टकरी येणार असून त्यांच्यावर आर्थीक भार पडू नये, यासाठी त्यांच्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण,कोकण भवन,मुंबई व व्यवस्थापकीय संचालक,राष्ट्रीय महामार्ग,मुंबई यांना पत्र दिले असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवूनही मागणी केली आहे.

मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण,कोकण भवन,मुंबई व व्यवस्थापकीय संचालक,राष्ट्रीय महामार्ग,मुंबई यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या मुंबई येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी बीडसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने नागरिक मुंबई कडे प्रवास करणार आहेत.या प्रवासासाठी हजारो वाहने मुंबईकडे येणार असून त्यामुळे मार्गावरील टोल नाक्यांवर मोठी गर्दी होणार आहे तसेच प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार येणार आहे.शेतकरी,युवक आणि सर्वसामान्य नागरिक स्वयंस्फूर्तपणे याआंदोलनात सहभागी होत असल्यामुळे त्यांच्यावर जादा खर्च पडू नये,यासाठी त्या कालावधीत मुंबईकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्यात यावी,या निर्णया मुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल,टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल व वाहतूक व्यवस्थापन सुलभ होईल म्हणून या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत,असे म्हटले आहे.मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण,कोकण भवन,मुंबई व व्यवस्थापकीय संचालक,राष्ट्रीय महामार्ग,मुंबई यांना पत्र दिल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची देखील भेट घेतली. यावेळी मराठा समाजाच्या मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोल माफीचा निर्णय घेण्यात यावा,तसे आदेशआपण द्यावेत,अशी मागणीही केली.यावेळी दोघात टोलमाफिच्या विषयावर सकारात्मक चर्चा झाली आहे.

समाजासाठी पत्र देणारे पहिले लोकप्रतिनिधी

राज्यात मराठा आरक्षण प्रश्नीवातावरण



तापलेले आहे.दि.२९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन होत आहे. यासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या गरीब मराठा समाजावर आर्थीक भार पडू नये

# सामान्यांच्या जीवावरचे संकट आणि आमदार धस ठरले खरे लोकनायक

पाटोदा ।प्रतिनिधी

तालुक्यातील सावरगाव घाट येथील वंचित मातंग समाजातील समाधान कान्हु वाल्हेकर या ऊसतोड मजुराच्या मुलाला दुर्मीळ आणि गंभीर आजार गिलियन-बरे सिंड्रोम (जी.बी.एस.) झाला. वडील ऊसतोडीच्या मजुरीवर कुटुंब चालवणारे. घरात हलाखीची परिस्थिती. मुलाच्या उपचारासाठी सात ते आठ लाख रुपयांचा खर्च सांगण्यात आला. एवढी मोठी रक्कम उभी करणे कुटुंबाला शक्यच नव्हते. परंतु आमदार सुरेश धस यांच्या तातडीच्या पुढाकारामुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पाच लाख रुपयांचे साहाय्य मिळाले आणि या तरुणाचा जीव वाचवण्याचा मार्ग मोकळा झाला.

समाधान वाल्हेकर याला सुरुवातीला नगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र तेथे योग्य उपचार न झाल्याने पुण्यातील डी. वाय. पाटील हॉस्पिटल येथे हलविण्यात आले. रुग्णालय प्रशासनाने मोठा खर्च अपेक्षित असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे पैशांची जुळवाजुळव करण्यासाठी कुटुंबीयांनी नातेवाईकांकडून कर्ज काढून कसाबसा उपचार सुरू केला. पण एवढ्या मोठ्या खर्चाची तरतूद करणे शक्य नसल्याने कुटब हतबल झाले होते. अशा वेळी रुग्णाचे नातेवाईक व सुरुडी (ता. आष्टी) येथील सरपंच रोहीदास साबळे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी समाधानच्या कुटुंबाला आमदार सुरेश धस यांचा मोबाईल क्रमांक



दिला आणि संपर्क करण्यास सांगितले. आमदार फोन उचलतील का? अशी भीती असतानाच जेव्हा धस यांना फोन लावण्यात आला, तेव्हा त्यांनी तत्काळ परिस्थितीची दखल घेतली. धस यांनी स्वतः आरोग्य विभागाचे कामकाज पाहणारे सहकारी विकास साळवे तसेच पाटोदा येथील सोमीनाथ कोल्हे दत्ता हुले यांना कागदपत्रे जुळवा जुळव करण्याच्या सूचना दिल्या त्यानंतर तातडीने मंत्रालयात पाठवण्याच्या सूचना केल्या. एवढेच नव्हे तर त्यांनी थेट मंत्रालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी संपर्क साधून रुग्णाची गंभीर परिस्थिती समजावून सांगितली. फक्त काही मिनिटांतच पाच लाख रुपयांची

फाईल मंजूर झाल्याचा संदेश रुग्णालयाला मिळाला. आणि त्यानंतर उपचार सुरू होऊन रुग्णाची प्रकृती स्थिर झाली. ऊसतोड मजुरांच्या मुलासाठी आमदार सुरेश धस यांनी दाखवलेली ही तत्परता आणि माणुसकी आज सर्वदूर कौतुकाचा विषय ठरली आहे. गरीब कुटुंबातील या तरुणाचे प्राण वाचवण्यासाठी केलेला आमदारांचा हा प्रयत्न हे जनतेसाठीचे त्यांचे असलेले संवेदनशील

# आरोग्य कर्मचार्यांचा तिसर्या दिवशीही संप सुरुच,तालुक्यातील आरोग्य सेवा विस्कळित

परळी(प्रतिनिधी)

दहा वर्षे सेवा पुर्ण झालेल्या आरोग्य कर्मचार्यांना नियमित शासन सेवेत समायोजन करावे,बदली धोरण,वेतनवाढ,आरोग्य व अपघात विमा आदी मागण्यांसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी,कर्मचारी एकत्रिकरण समितीच्या वतीने दि.१९ ऑगस्ट पासुन सुरु असलेले कामबंद व परळी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयापुढे ठिय्या आंदोलन दि.२१ ऑगस्ट रोजी तिसर्या दिवशीही सुरुच आहे.या आंदोलनात परळी तालुक्यातील ८६ कर्मचारी सहभागी झाले आहेत.यामुळे परळी




दहा वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचार्यांचे १०० टक्के समायोजन व प्रत्येक वर्षी ३० टक्के याप्रमाणे सा.आरोग्य विभाग,ग्राम विकास,नगर विकास,वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागात समावेश करावा आदी मागण्यांसाठी परळी तालुक्यातील ८६ आरोग्य कर्मचार्यांनी मंगळवार दि. १९ ऑगस्ट पासुन बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले आहे.कर्मचार्यांच्या कामबंद आंदोलनामुळे परळी तालुक्यातील आरोग्य उपकेंद्र,प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत असलेल्या नियमित लसीकरण,तपासणी,औषधोपचार आदी आरोग्य सेवा विस्कळित झाल्या आहेत.या कामबंद आंदोलनात विष्णू मुंडे,सुप्रिया घुंडरे,अंजली वाळले,सुप्रिया तिडके, विजयमाला टाक,अर्चना घुंडरे,जे.पी.घाडगे,ए.डी.चित्तापुरे,अश्विनी मुंडे,समिती लटपटे,सिमीती जाधव,एस.व्ही.बोरवड,एम.एच.नेमाडे,गोविंद लोखंडे,उमेश शिरोळे,शुभम पोतदार,मगन वसावे,गोविंद पौळ,मिलिंद सोनकांबळे,आनंद टेकाळे,सुमंत पवार,आशिष वाघमारे,सागर जाधव,शिवाजी वैद्य,संतोष गायकवाड आदी ८६ आरोग्य कर्मचारी सहभागी झाले आहेत.

# राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे काम अतुलनीय जिल्हाधिकाऱ्यांनी मानले आभार

मुखेड /प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस व अतिवृष्टी झाल्याने काही गावात पूरस्थिती निर्माण झाली होती. या ठिकाणी मदत व बचाव करण्यासाठी नांदेड येथे मागील दोन महिन्यांपासून तैनात असलेली राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची तुकडी जिल्हाप्रशासनाने तातडीने पाठविली. बचाव कार्य पूर्ण झाल्यानंतर आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकडीचे कृतज्ञता व्यक्त करून आभार मानले.

मुखेड तालुक्यातील १७ व १८ ऑगस्ट रोजी मोठ्या प्रमाणावर पाऊस व अनेक मंडळात अतिवृष्टी झाली होती. दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी मंडळात



३५४.७५ मिमी व मुक्रामाबाद मंडळात २०६.७५ मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे हसनाळ, रावणगाव, भासवाडी व भिंगोली या गावात पूरस्थिती निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थ अडकून पडले होते.

दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे ०२:३० वाजता हसनाळ व रावणगावमध्ये गावात पावसाचे पाणी घुसले असल्याबाबत ग्रामस्थांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी पूरपरिस्थिती असलेल्या गावांमध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची टीम पाठविली. पहाटे ०३ वाजता राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची टीम नांदेडहून निघून सकाळी पाच वाजता घटनास्थळी पोचली. पहाटे पाच वाजल्यापासूनच या तुकडीने बचाव कार्यास सुरूवात केली. या तुकडीने रावणगाव येथील २७१, हसनाळ येथील ३०, भासवाडी येथील ४० व भिंगोली येथील ४५ असे एकूण ३८६ लोकांना बोटीच्या सहाय्याने सुरक्षित ठिकाणी हलविले. त्यामुळे आणखी मोठी हानी टाळणे शक्य झाले. तसेच या तुकडीला हसनाळमध्ये पुराच्या पाण्यामधून तीन महिलांचे मृतदेह काढण्यात यश आले. या तुकडीमुळे आपत्तीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनास मोठी मदत झाली. आज गुरुवार २१ ऑगस्ट रोजी दुपारी जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी ही तुकडी तैनात असलेल्या जिल्हा क्रीडा संकुल येथे जाऊन तुकडीतील सर्व अधिकारी व जवान यांच्याशी संवाद साधला. तसेच या बचाव कार्यात जखमी झालेल्या ८ जवानांची विचारपूस केली. या प्रसंगी बोलताना अशा प्रकारे जीवावर उदार होऊन कमीत कमी वेळात एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांचे प्राण वाचविण्याचे अतुलनीय आपल्या तुकडीने केले असून आपल्या कामाचे कौतुक शब्दात व्यक्त करणे शक्य नाही असे उद्गार जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी काढले व केलेल्या कामाबद्दल त्यांनी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकडीचे आभार मानले. याप्रसंगी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे पोलीस उपनिरीक्षक शंकर उकंडे, पोलीस उपनिरीक्षक सुधीर शिरसाट, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुन्हे पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभारे, जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राचे बारकुजी मोरे, कोमल नागरगोजे हे उपस्थित होते.